ॐ

छात्र

# प्रबोधन

मासिक पत्रक

वर्ष २, अंक २

सौर भाद्रपद, शके १९१५

इवली शल्ये रुपती खुपती, मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख लेऊनी, ने ज्योतिर्जगतात

ज्ञान प्रबोधिनीद्वारा कुमारांसाठीचे अभिनव मासिक !



## आम्ही जग जिंकलेच पाहिजे !

'त्या तेजस्वी डोळ्यांमधली
वीज अजूनी सांगते
उत्तिष्ठत जाग्रत बंधूंनो
उत्तिष्ठत जाग्रत !'

## या अंकात काय दडलंय ?


- स्वामी विवेकानंदांच्या दिग्विजयाची शताब्दी — २
- रहस्यकथा-चॉकलेट रहस्य-भाग-२ — ५
- असंही एक रक्षाबंधन — ७
- प्रगतगावची एस्. टी. — ८
- व्यक्तिमत्त्व विकसनाच्या पाऊलवाटा
- सफर कवितांच्या दुनियेची — ११
- सामाजिक बुद्धिमत्ता म्हणजे काय? — १२
- असंही जगणं असतं — १४
- वाचलेच पाहिजे असे काही — १५
- आम्हीच लिहिणार आमचे पान — १६
- असे घटते सुंदर अक्षर — १७
- अभ्यासातील स्वावलंबन-लघुत्तरी प्रश्न — २१
- गणपतीपुढील सजावट — २३
- भारताचा स्वातंत्र्योत्तर इतिहास-१९४७-१९५७ भाग-१ — २५
- प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास — २८
- विज्ञानाच्या चष्म्यातून-कॅबिनेट ड्रायर तयार करा. — २९
- आकाश का निळे...निळे? — ३०
- ओळख महाराष्ट्राची - भौगोलिक महाराष्ट्र — ३२
- 'तेव्हाचे शिक्षण आत्ताचे यश' — ३५


मित्रमैत्रिणींना अंक दाखवा ! त्यांनाही सभासद करून घ्या !!

## १० वी साठी अभ्यास मार्गदर्शन

सभासद असलेल्या कुटुंबामधील कोणी सदस्य इ. १० वी मध्ये शिकत असल्यास त्यांच्यासाठी **'अभ्यास कसा करावा?'** या संदर्भातील पहिला मार्गदर्शन वर्ग **रविवार, १२ सप्टेंबर १९९३, रोजी सायं. ४ ते ७** या वेळात ज्ञान प्रबोधिनी, पुणे येथे होईल. सर्वांनी येताना आपली 'प्रबोधन'ची पावती व वही, पेन घेऊन यावे. सभासद नसलेल्या कोणाला या वर्गाला यावयाचे असल्यास त्यांना १० रुपये भरून उपस्थित राहता येईल. *

## दीपावली विशेषांकासाठी स्पर्धा

**कथा स्पर्धा :** विज्ञानकथा, काल्पनिककथा, रहस्यकथा, साहसकथा वा अन्य ललितकथा स्वत:च्या भाषेमध्ये ५०० शब्दांत लिहून ३० सप्टेंबर पर्यंत प्रबोधनच्या पत्त्यावर पाठवावी.

**चित्र स्पर्धा : विषय : विद्यार्थी म्हणून आमच्या समस्या !** स्वत:च्या चित्राला योग्य योग्य शीर्षक द्यावे.

**बक्षिसे :** प्रथम क्रमांक - ५१ रुपये, द्वितीय क्रमांक - ३१ रुपये, तृतीय क्रमांक - २१ रुपये, ३ उत्तेजनार्थ बक्षिसे.

*याशिवाय प्रबोधन अंकात प्रसिद्धी !* *

## सभासद कोण? उपक्रम कोणासाठी?

'छात्र प्रबोधन'ची वर्गणी कोणाच्याही नावाने भरलेली असली तरी कुटुंबाने सर्वच सदस्य छात्र प्रबोधनचे सभासद आहेत. या मासिकाद्वारा जाहीर केले जाणारे विविध मेळावे, सहली, शिबिरे यांच्यामध्ये मात्र त्या कुटुंबातील ७ वी ते १२ वी पर्यंतचीच मुले मुली सहभागी होऊ शकतील. *

## जुन्या अंकांची उपलब्धी

मागील वर्षीचा वासंतिक विशेषांक व वर्षभरातले मिळून ४ अन्य अंक विक्रीसाठी उपलब्ध आहेत. विशेषांकाची किंमत रु. ६/- अन्य अंक प्रत्येकी रु. ३/- (पोस्टेज खर्च रु.२/- एकूण मिळून) *

## पत्रव्यवहार कसा करावा?

मासिकाच्या कार्यालयांशी पत्रव्यवहार करताना खालील गोष्टी पत्रात लिहिल्या आहेत ना ह्याची खात्री करावी.

१. पत्र लिहिण्याचा दिनांक,
२. स्वत:चे संपूर्ण नाव व गाव,
३. आपला पावती क्रमांक,
४. पत्त्यावर संपादक, 'छात्र प्रबोधन' असा उल्लेख करून पूर्ण पत्ता.

तसेच अंकात छापण्यासाठी काही लेखन पाठवायचे असल्यास ते मोठ्या आखीव तावावर (फुलस्केप वर) ५ सें. मी. चा समास सोडून एकाच बाजूला लिहावे. *

## आवाहन जाहिरातींचे

आपले अर्थपूर्ण मासिक 'छात्र प्रबोधन' हे आर्थिक अडचणींमुळे अडचणीत येऊ नये व आर्थिक चणचण असलेल्या गरीब विद्यार्थ्यांपर्यंत सवलतीच्या दरात हे मासिक पोहोचवून त्यांच्याही आयुष्यात अर्थ निर्माण करता यावा म्हणून दीपावली विशेषांकासाठी प्रयत्नपूर्वक स्वत:च्या अन् इतरांच्या जाहिराती मिळवून द्या !

दर (रुपयांत)

| पानांचा तपशील | १/२ पा. | पूर्ण पा. |
|---|---|---|
| १. अंकाच्या आतील पाने | ४०० | ६०० |
| २. मल पृष्ठाच्या आतले पान (दुरंगी) | ६०० | १००० |
| ३. मलपृष्ठ (दुरंगी) | - | १५०० |

*

## संवाद

*प्रिय प्रबोधक मित्र-मैत्रिणींनो,*

*'प्रबोधन'चा या वर्षातला पहिला अंक आवडल्याचे समक्ष अथवा पत्राद्वारे अनेकांनी कळविले. पण कथा-विनोद यांच्या बरोबरच इतरही लेख तुम्ही वाचताय ना ! त्यात सुचविलेल्या कृती करून पहाता आहात ना ! एखादा प्रयोग किंवा चॉपर तयार करून पाहाणे, कोल्ड सिरॅमिकचा वापर करून कुंड्या सजविणे, श्वसनाचा व्यायाम, अभ्यासातील प्रश्न कौशल्यांचा वापर करून अभ्यास करणे इथपासून ते १५ ऑगस्टला कुटुंबातील सर्वांनाच ध्वजवंदनास उपस्थित राहण्यास सांगणे इथपर्यंतच्या विविध कृती तुम्ही केल्यात ना ! दैनंदिन अभ्यास, शाळा, क्लासेस् इ. मध्येच जखडून राहिलात तर या मासिकाचा तुम्हाला मनोरंजनापलिकडे फारसा उपयोग नाही. यामध्ये सुचविलेल्या विविध गोष्टी करून बघण्यासाठी आठवड्यातून काही वेळ काढला तर तुम्ही खरे प्रबोधक व्हाल. आपल्या प्रबोधनच्या सभासदांपैकी अधिकाधिक जणांनी अशा प्रकारे प्रबोधक असावे असं आवर्जून सांगावसं वाटतं.*

*मागच्या महिन्यात महाराष्ट्रामध्ये लातूर, सोलापूर, धुळे अन् सांगली येथे मी स्वत: तर नगर, औरंगाबाद, ठाणे अन् मुंबई येथे अन्य युवक प्रबोधनच्या प्रचारासाठी गेले होते. महाराष्ट्रातील इतरही काही जिल्ह्यांमध्ये येत्या एकदोन महिन्यात दौरे होतील. या सर्वांमधून महाराष्ट्रभरातील धडपडणाऱ्या, वेगळं अन् चांगलं काही करू इच्छिणाऱ्या मुलामुलींपर्यंत हे मासिक पोहोचावे असा प्रयत्न आहे. या दौऱ्यांमध्ये असे अनेक जण भेटले; नव्हे, ते मासिकाची जणू वाटच पहात होते असा आनंददायक व उत्साहवर्धक अनुभव आला. उपलब्ध वेळेमध्ये आम्ही सर्वांपर्यंत पोहोचू शकलो नसलो तरी महाराष्ट्रातील आपले सर्व सभासद त्यांच्या धडपडणाऱ्या अनेक मित्रमैत्रिणींपर्यंत हे मासिक पोहोचवतील असा विश्वास वाटतो.*

*स्वामी विवेकानंदांच्या शिकागो येथील सर्वधर्म परिषदेसमोरील व्याख्यानाला ११ सप्टेंबरला १०० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त काही कृती पहिल्या लेखात सुचवित आहोत. हस्ताक्षरांसाठी दिलेल्या कागदांचा वापर करून ते सुधारण्यासाठी सराव करताय ना. दीपावली विशेषांकासाठी काही लेखन, सूचना जरुर पाठवा. ५ सप्टेंबरचा शिक्षकदिन आणि यंदाचा गणेशोत्सव वेगळ्या पद्धतीने साजरा करा.*

*बरंय. भेटूयात वारंवार ! समक्ष अथवा पत्राद्वारा !*

**सस्नेह तुमचा,**

**महेन्द्र सेठिया**

# स्वामी विवेकानंदांच्या दिग्विजयाची शताब्दी

**डॉ. गिरीश बापट**

स्वामी विवेकानंदांचे स्मरण करायचे ते केवळ त्यांच्या वित्तेकरिता किंवा वीरवृत्तीकरिता नाही तर ते, हे सर्व गुण असलेले देशभक्त संन्यासी होते म्हणून. सर्वधर्म परिषदेतील पहिले भाषण झाल्यानंतर शिकागोतील प्रसिद्ध कोट्याधीश मार्टीन जोनस् यांच्या घरी स्वामीजी मुक्कामाला होते. त्यांचा निरोप घेऊन स्वामीजी आपल्या खोलीत गेल्यानंतर काय झाले, हे एका कथेमध्ये प्रबोधिनीचे संस्थापक कै. वि. वि. पेंडसे यांनी लिहिले आहे. 'खोलीभर निळा प्रकाश पडेल अशी योजना केलेली होती. भिंतीवरील सूक्ष्म रंगरंगोटी त्या निळ्या प्रकाशात खुलून दिसत होती. वैभवाने नटलेल्या त्या खोलीत एका बाजूस शोभिवंत पलंग व त्यावर मऊ पिसांचा बिछाना अंथरलेला होता. भारावलेल्या मन:स्थितीत विवेकानंद पलंगापाशी गेले. दुपारी झालेल्या परिषदेनंतर प्रथमच त्यांना एकांत मिळाला होता. परिषदेमध्ये ते स्वत: भाषणाला उठले ती वेळ, तो टाळ्यांचा कडकडाट, देवी सरस्वतीचे स्मरण, त्या स्फुर्तीतून झालेले भाषण, त्यानंतर झालेल्या टाळ्या ह्या सर्व गोष्टी त्यांच्या मन:चक्षूसमोरून सरकत गेल्या.

भाषणानंतर लोकांनी केलेले अभिनंदन, उधळलेली फुले, ही दृष्ये मनात येऊन गेली. एवढ्याशा अल्प अवधीत विविध भावनांचा अनुभव त्यांना आला.

भारावलेल्या मन:स्थितीत ते पलंगापाशी गेले. खोलीचे काहीसे अवलोकन त्यांनी केले आणि ते पलंगावर बसले मात्र !

तोच हजारो विंचवांनी एका क्षणी नांग्या माराव्यात तशा शिणका त्यांच्या शरीरातून निघाल्या. ते एकदम उभे राहिले. मन त्यांना विचारू लागले, 'अरे तू कोण? तू कुठे आहेस? तुझा देश कोणता? तुझा वेष कोणता? तुझा धर्म कोणता?'

ऐश्वर्य आणि यश शिखरावर असलेल्या स्थितीत विवेकानंदांच्या चित्तासमोर हिंदुस्थान उभा राहिला. स्वदेश मूर्तिमंतपणे दिसू लागला. तीस कोटी हिंदू समाज, त्याचे दारिद्र्य, त्याचा विस्कळीतपणा, त्याचे अज्ञान, त्याचे पारतंत्र्य, त्यातील अपमान, त्यातील दु:ख, तेथील दुष्काळ, तेथील हालअपेष्टा त्यांना साक्षात दिसू लागल्या. गुरुबंधूंच्या सान्निध्यात संन्यासधर्माची घेतलेली प्रतिज्ञा स्फुरू लागली. त्यांच्या मनात कालवाकालव होऊ लागली. खोलीतले ते ऐश्वर्य त्यांना खायला उठले. ते त्यांना सहन होईना.

अभावितपणे त्यांची पावले गच्चीकडे वळली. गच्चीवर बाहेर अंधार पसरलेला होता. त्या अंधारात आकाशातील तारे चमकून दिसत होते जणू ते विवेकानंदांचे सांत्वन करू इच्छित होते. विवेकानंद कितीतरी वेळ

गच्चीपाशीच उभे राहिले, विचारांच्या कोलाहलात त्यांच्या डोळ्यांतून अश्रूधारा वाहू लागल्या, आकाशातील आकाशगंगाच जणू त्यांच्या डोळ्यांवाटे वाहू लागली.

पण तेवढ्यानेही मनाचा भार हलका होईना. मनाच्या यातना इतक्या वाढल्या की ते तेथेच पडले. फरशीवर गडबडा लोळत लोळत ते स्फुंदून स्फुंदून रडू लागले. काही वेळाने मन आवरून त्यांनी आईचे स्मरण केले, हात जोडले व प्रार्थना केली.

**'आई जगदंबे, माझी मातृभूमी जोपर्यंत भीषण दारिद्र्याच्या दु:खात आहे तोपर्यंत मला लाभणाऱ्या यशाचे आणि कीर्तीचे काय? मूठभर तांदुळासाठी माझ्या देशातील लाखो लोकांना मरावे लागत आहे आणि येथे सामान्य व्यक्तीच्या क्षुद्र सुखासाठी वैभवाच्या राशी ओतल्या जात आहेत! आई, माझा देश जागृत कसा होईल? सुखी कसा होईल? शहाणा कसा होईल? जगदंबे, कालीमाते, यातून मार्ग दाखीव!'**

प्रार्थना करता करता तन्मय झालेल्या चित्ताची समाधी लागली. विवेकानंदांना त्याच स्थितीत फरशीवर झोप लागली.

ही रात्र होती ११ सप्टेंबर १८९३ ची! या दिवशी सकाळी शिकागोमधील सर्वधर्म-परिषदेसमोर स्वामी विवेकानंदांनी पहिले व्याख्यान दिले. आज या घटनेला १०० वर्षे पूर्ण होत आहेत.

या शताब्दी निमित्ताने स्वामी विवेकानंदांच्या चरित्राचे स्मरण अनेक प्रकारांनी होणार आहे. स्वामी विवेकानंदांच्या शिकागो येथील पहिल्या व्याख्यानाचे सुरुवातीचे शब्द भारतातल्या सर्वांनाच परिचित आहेत. 'अमेरिकेतील माझ्या भगिनींनो आणि बंधूंनो' अशी सुरुवात करुन स्वामीजींनी त्या व्याख्यानात पुढे म्हटले आहे - 'जो धर्म समस्त जगताला 'सहिष्णुता' आणि 'सर्वच मतांना मानणे' या दोहोंचीही शिकवण निरंतर देत आला आहे, त्या धर्मात जन्मास आल्याबद्दल मला अभिमान वाटतो. अन्य धर्मीयांविषयी आम्ही केवळ सहिष्णुताच बाळगतो असे नव्हे, तर सर्वच धर्म सत्य आहेत असा आमचा दृढ विश्वास आहे. परकीयांच्या छळामुळे देशोधडीला लागलेल्या निराश्रितांना ज्या जातीने सर्वदा आश्रय दिला आहे त्या जातीत जन्मास आल्याबद्दल मला अभिमान वाटतो. ज्या वर्षी रोमनांच्या निष्ठूर अत्याचारांनी यहुदी लोकांचे पवित्र देवालय भग्न होऊन मातीस मिळाले. त्याच वर्षी काही जातीवंत यहुदी आश्रयार्थ दक्षिण भारतात आले असता माझ्या जातीने त्यांना सादर हृदयाशी धरीले. हे सांगताना मला भूषण वाटते आहे वैभवशाली पारशी जातीच्या उरलेल्या लोकांना ज्या धर्माने आसरा दिला आणि आजही जो धर्म त्याचे प्रतिपालन करीत आहे. त्याच धर्मात मी जन्मास आलो आहे.''

इतर सगळ्याच प्रतिनिधीपेक्षा वेगळाच विचार स्वामीजींनी सगळ्यांसमोर मांडला. या धर्मपरिषदेत स्वामीजींनी एकूण दहा भाषणे

केली. पहिल्या भाषणात सहिष्णुतेपासून सुरुवात करून शेवटच्या समारोपाच्या भाषणात त्यांनी सर्वांना समन्वयाच्या भूमिकेपर्यंत नेऊन पोहोचविले. समारोपाच्या भाषणात त्यांनी सर्वांना पुढील आवाहन करून सर्वधर्मपरिषद पूर्णपूणे जिंकून टाकली– ''या सर्वधर्म परिषदेने जर काही जगाच्या निदर्शनास आणले असेल तर ते हेच की पावित्र्य, चित्तशुद्धी, दयादाक्षिण्य वगैरे गुणांचा मक्ता जगातील कोणत्याही एका विशिष्ट धर्माने घेतलेला नाही. प्रत्येक धर्मात अतिउदात्त चरित्राच्या नरनारींचा जन्म झाला आहे. हा एवढा भरभक्कम पुरावा दृष्टीसमोर असूनही आपलाच तेवढा धर्म शेवटी जिवंत राहून इतर धर्म नष्ट होतील असे मनोराज्य कुणी रचीत असेल, तर त्या अभाग्याची आपण कीवच केली पाहिजे. त्या बापड्याला मी अगदी स्पष्ट शब्दात बजावून ठेवतो की, त्याच्यासारख्या लोकांनी कितीही अडथळे उभे केले तरी त्या साऱ्यांना तिळमात्र न जुमानता, धर्माधर्मांच्या ध्वजावर लवकरच लिहिले जाईल.

**'संघर्ष नको, परस्परांना सहाय्य करा.'**
**'आत्मसात करा, विनाश करू नका.'**
**'कलह नको – मैत्री हवी, शांती हवी.'**

११ ते २७ सप्टेंबर १८९३ असे सतरा दिवस चाललेल्या सर्वधर्मपरिषदेची शताब्दी या वर्षी 'छात्र प्रबोधन' च्या सर्व वाचकांनी स्वामी विवेकानंदांच्या चरित्राचे आणि विचारांचे वाचन, श्रवण आणि स्मरण करून साजरी करावी. ११ सप्टेंबरला स्वामी विवेकानंदांच्या चरित्रातील काही प्रसंगांचे आपापल्या शाळेत किंवा वर्गात सामुदायिक वाचन करावे. १९ ते २४ सप्टेंबर या काळात बहुतेक सर्व शाळांमधून गणेशोत्सव साजरा होईल. स्वामीजींच्या भाषणांमधील उताऱ्यांचे पाठांतर, स्वामीजींच्या जीवनातील इतर प्रसंगांचे नाटचीकरण असेही कार्यक्रम गणेशोत्सवाच्या काळात 'छात्र प्रबोधन'च्या वाचकांना करता येतील.

अनेक शाळांना या शताब्दीनिमित्त काही कार्यक्रम योजणे शक्य आहे. ११ ते २७ सप्टेंबर या काळात शक्य तितके दिवस सामुदायिक प्रार्थनेच्या वेळी नित्याच्या परिपाठात स्वामीजींच्या विविध उताऱ्यांचा समावेश करता येईल. शिकागोच्या पहिल्या भाषणात स्वामीजींनी शिवमहिम्न स्तोत्राचा उल्लेख केला आहे. शिवमहिम्नातील काही श्लोकांचे गायन करता येईल आणि त्याचा अर्थ सांगता येईल. ज्ञान प्रबोधिनीद्वारा अशा निवडक उताऱ्यांचा, शिवमहिम्न स्तोत्र व विवेकानंदांवरील गीतांचा संग्रह पुस्तिकेच्या स्वरूपात तयार केला आहे. ती हवी असल्यास शाळेत अथवा वर्गातील सामूहिक वाचनासाठी मोफत उपलब्ध होऊ शकेल. त्यासाठी वर्गशिक्षक अथवा मुख्याध्यापकांच्या स्वाक्षरीचे पत्र 'प्रबोधन'च्या पत्त्यावर पाठवावे. उरलेल्यांना ५ रुपयांमध्येही पुस्तिका (पोस्टाद्वारे अथवा समक्ष) मिळू शकेल. या शताब्दीनिमित्त आपण काही कार्यक्रम योजल्यास कार्यक्रम झाल्यावर त्याचे थोडक्यात लेखी निवेदन 'छात्र प्रबोधन'कडे पाठवावे.

***

# चॉकलेटचे रहस्य



**अनु. सौ. शैलजा देशमुख**

सौ. बेरेसफोर्ड यांच्या मृत्यूने पोलीस-खात्यासमोरून एक मोठे आव्हान अनेक प्रश्नचिन्हांच्या रूपात उभे राहिले; पण व्यर्थ, तपासात कोणताच आशादायक धागा-दोरा हाती लागेना !

आपल्यावर हल्ला करण्याचा कोणी प्रयत्न केला असावा याचा तर्क श्री. विल्यम्सना करता येईना, कारण आपल्या पत्नीपासून ते विभक्त रहात होते आणि ती तर फ्रान्समध्ये रहात होती. त्यांच्या संपत्तीचा वारस असणारा त्यांचा पुतण्या स्वत:च इतका श्रीमंत होता की काकांचा खून करून संपत्ती मिळवावी असे त्याला वाटण्यासारखी स्थिती नव्हती. चॉकलेट्सच्या विश्लेषणात असे आढळले की त्यात तीव्र बदामाचे तेल नव्हे तर ''नायट्रोबेन्झाइन'' नावाचे विषारी द्रव्य होते. ते सामान्यत: रंगाच्या कारखान्यात वापरले जाते.

मेसन्स कंपनीचा टंकलेखक मेर्टन याने पत्राचा कागद ओळखला. तो कागद जुन्या साठ्यातून पळवला गेला असावा. खोक्यावर गुंडाळलेल्या खाकी कागदावर छापलेला सर विल्यम्सचा पत्ता टंकलिखित असल्याने पुराव्याच्या दृष्टीने निरूपयोगीच होता. त्यावरील शिक्क्यावरून फक्त एवढेच समजले की पार्सल खुनाच्या आदल्यादिवशी रात्री ८.३० ते ९.३० च्या दरम्यान साअुदम्पटन रस्त्यावरील पोस्ट ऑफिसमध्ये दिले गेले होते.

श्री. रॉजर शेरींगहॅम आणि पोलीसप्रमुख श्री. मोर्सबी यांच्या भेटीत या सर्व मुद्यांवर चर्चा झाली.

''हे कुणीतरी सूडाने पेटलेल्या स्त्रीचेच काम असावे. कारण कुणा पुरुषाला हा प्रयोग करायचा असता तर चॉकलेट्सऐवजी त्याने मद्याची बाटली, सिगारेट्स इ. चा उपयोग केला असता.'' श्री. मोर्सबी यांच्या या मताशी श्री. शेरींगहॅमही सहमत होते पण एक दिवस अशी घटना घडली की या सगळ्या प्रकरणाला एक वेगळीच कलाटणी मिळाली.

एके दिवशी श्री. रॉजर बाँडस्ट्रीटवरून चालले होते. अचानक समोरून सौ. वेरेकर या तुरुतुरु येताना दिसल्या. मुलखाची बडबडी बाई होती ती ! तिला चुकवून पळण्याचा श्री. रॉजर यांचा विचार रस्त्यावरील सिग्नलमुळे फसला.

''वा, मि. शेरींगहॅम, मला तुम्हालाच भेटायचं होतं हो ! तुम्ही सौ. बेरेसफोर्डच्या हत्येची केस हाता घेताय ना? अहो, तिच्या मृत्यूची बातमी ऐकून मी तर हादरूनच गेले पहा! जोन माझी जिवाभावाची मैत्रीण होती...खरं सांगू का, जोनने आपला मृत्यू आपल्याच हाताने ओढवून घेतला पहा !''

श्री. रॉजर एकदम सजग झाले. ''काय म्हणताय काय? असे उद्गार त्यांच्या तोंडून बाहेर पडले.

''दैवदुर्विलास म्हणतात ना तो असा!'' जोनने आपल्या पतीशी लावलेल्या पैजेबद्दल तुम्हाला माहिती आहेच.'' आवाज हळू करत सौ. वेरेकर म्हणाल्या, अहो, तुम्हाला म्हणून सांगते, जोनने अशी पैज लावणं काही बरोबर केलं नाही. आम्ही दोघींनी मिळून तर ते नाटक पूर्वी पाह्यलं होतं आणि नाटकाचा खलनायक कोण हेही तिला चांगलं माहिती होतं. पुन: जोन तशी गंभीर स्वरूपाची मुलगी ! गंमत म्हणून अशी पैज लावणं तिच्या स्वभावात बसत नाही पहा ! एकतर

तिचा सरळपणा हे नाटक असावसं वाटतंय. आपल्या पतीशीही ती प्रामाणिक नसावी. मला काही पत्ता लागू दिला नाही पहा तिनं !

''आणि सर विल्यम्स...त्यांच्याबद्दल काय? श्री. रॉजरनी हळूच वाक्य टाकले.

''त्यांच्याबद्दल काय सांगावं, खूप स्वच्छंदी, स्वैराचारी गृहस्थ आहे बघा तो, आता तसे दोघेही माझ्या मित्रमंडळातीलच आहेत.''

सौ. वेर्रेकरबाईंची बडबड ऐकायला आता श्री. रॉजरना वेळ नव्हता. डोक्यात चक्रं फिरत होती. खिशात सर विल्यम्स, श्री. बेरेसफोर्ड यांची छायाचित्रे घेऊन त्यांनी आपला मोर्चा वळवला तो त्या सुप्रसिद्ध रेनबो क्लबकडे. तिथल्या नोकरांना ओळख सांगून त्यांनी अनेक प्रश्न विचारले.

त्या घटनेच्या आदल्या रात्री सर विल्यम्सनी क्लबमध्येच जेवण घेऊन संपूर्ण संध्याकाळ तेथे घालवली होती. ते तिथून बाहेर पडलेच नव्हते. त्यानंतर ते मेर्टनकडे थडकले. आपल्याला काही विशिष्ट प्रकारचे टंकलेखन करून घ्यायचेय असे भासवून ''१५ दिवसांपूर्वी माझ्या या मित्राने तुमच्याकडे असेच टंकलेखन करून घेतलेय ना !'' असे म्हणत एक छायाचित्र दाखवले. ''खरंच की १५ दिवसांपूर्वी हे गृहस्थ येथे आले होते खरे.'' काऊंटरवरील मुलगी पुटपुटली.

दुसऱ्या दिवशी सकाळी सकाळीच श्री. रॉजर, इन्स्पेक्टर मोर्सबी यांना भेटले. ''हे बघ मोर्सबी, सौ. बेरेसफोर्ड यांच्या हत्येच्या आदल्यादिवशी पिकॅडली ते स्टँड या मार्गावर साऊदम्प्टन स्ट्रीटपर्यंत प्रवासी घेऊन गेलेल्या टॅक्सीवाल्यांची चौकशी तू करू शकशील का?''

''रॉजर अरे तुझ्या मनात तरी काय आहे?'' ''सर विल्यम्सला चॉकलेट्स कुणी पाठवली हे मला कळतंय असं वाटतंय फक्त पक्का पुरावा हवाय.''

''ठीक आहे बाबा, पाहू या प्रयत्न करून!'' दुपारपर्यंत त्या संध्याकाळी त्या मार्गावर प्रवासी घेऊन गेलेल्या सर्व टॅक्सीवाल्यांना मोर्सबीने पोलीस स्टेशनवर बोलावले होते. मोर्सबीला दिसणार नाही अशा तऱ्हेने एक छायाचित्र श्री. रॉजर सर्वांना दाखवत होते. त्यातील ९ व्या ड्रायव्हरने ते छायाचित्र अचूक ओळखले ! उत्सुकतेने मोर्सबी म्हणाले, ''अरे रॉजर, तू आता तरी मला सांगणार आहेस का?''

''सांगतो, पण खुन्याने आपल्याला छान चकवलं बरं का ! सर विल्यम्सचा खून करण्याचा कट फसून चुकून सौ. बेरेफोर्ड मृत्युमुखी पडल्या हे भासवण्याच्या त्याच्या प्रयत्नांना आपणही बळी पडलो बघ ! खरं तर सौ. बेरेफोर्डनाच त्याला मारायचं होतं आणि तो खुनी आहे श्री. बेरेसफोर्ड!' ''बापरे, हे तर ध्यानीमनी ही आलं नाही.'' ''हीच तर गंमत आहे. मी तपास केला तर बेरेसफोर्ड हा तसा छंदीफंदी माणूस आहे. त्याला कमी पडणारा पैसा पुरवायला पत्नीनं नकार दिला. म्हणून त्यानं हा कट रचला. सौ. वेर्रेकरांच्या म्हणण्यातून माझ्या लक्षात आलं की सौ. बेरेसफोर्डनी अशी पैज लावण्याचं कारण नव्हतं. ती चॉकलेट्स श्री. बेरेसफोर्डना वेगळ्या कारणासाठी हवी होती. त्यांचा स्वत:चा रंगाचा कारखानाही आहे. त्या संध्याकाळी नाटकाच्या मध्यंतरात जाऊन त्यांनी स्वत:चे पार्सल व पत्र पोस्टात टाकलं. टॅक्सीवाला, टंकलेखक मेर्टन दोघांनीही श्री. बेरेसफोर्डचं छायाचित्र ओळखलंय. आता सर्व पुरावे आपल्या हातात आहेत.''

''खरंच, रॉजर तुझ्यामुळेच या गूढ प्रकरणावर प्रकाश पडला. अन् खुन्याचा शोध लागला !''

असं नव्हे मोर्सबी, डोळे आणि कान उघडे

असले की...त्यादिवशी सौ. वेर्रेकरांच्या बडबडीकडे लक्ष दिलं नसतं तर कदाचित हे चॉकलेट्सचं रहस्य उलगडलंही नसतं. म्हणून म्हणतो प्रत्येक गोष्टीला योग्य वेळ यावी लागते.''

('Avenging Chance' या बर्कले यांच्या कथेचा स्वैर अनुवाद...समाप्त)

***

## असंही एक रक्षाबंधन

राखीपौर्णिमा – छान छान नवे कपडे घालून बहिण भावाला राखी बांधतेच हे गोड दृष्य तुमच्या आमच्या घरात दिसणारं ! पण अशा प्रेमासाठी भुकेले असलेलेही तुमचे काही बहीण–भाऊ आहेत याची जाणीव व्हावी म्हणून हा प्रपंच !

ज्ञान प्रबोधिनीतील ८–९–१० वी च्या विद्यार्थिनींनी या वर्षी राखीपौर्णिमा एका वेगळ्याच पद्धतीने साजरी केली. त्यासंबंधीचं निवेदन ऋता, सुप्रिया यांनी केलं. ते ऐकत असताना त्यांचा हा आगळा अनुभव तुमच्यापर्यंतही पोहोचवावा असं वाटलं.

इ. १० वीतील मुली गेल्या होत्या पुण्यातील 'निहार' येथे ! ही संस्था आ. विजयाताई लवाटे यांनी सजामातील वेश्याव्यवसाय करणाऱ्या स्त्रियांच्या मुलांसाठी चालवलेली. आई असूनही कौटुंबिक सुरक्षित जीवनाला पारखी झालेली ही निष्पाप मुलं! १ वर्षापासून १६–१७ वर्षे या वयोगटातील. आपल्याला राखी बांधण्यासाठी, नातं जोडण्यासाठी कुणी तरी येतं याचा आनंद तेथील मुलांना झाला. सर्वांनी एकत्र कथाकथन–करमणुकीचे कार्यक्रम केले. रक्षाबंधनाचा कार्यक्रम केला. तिथल्या मुलांनी या विद्यार्थिनींना निरोप दिला तो 'पुन: या!' असं आग्रहाचं निमंत्रण देऊनच !

इ. ८ वी ९ वी च्या मुली गेल्या होत्या 'रिमांडहोम'मध्ये ! दुर्दैवाने हातून घडलेल्या गुन्ह्यामुळे या सुधारगृहातील मुलींना बंधनात रहावं लागत असल्याने थोड्या कोमेजलेल्या ! पण हा सर्व खटाटोप त्यांचं जीवन पुन: उभं करण्यासाठीच ! त्यांच्या सहवासात या विद्यार्थिनींनी १ दिवस घालविला. रक्षाबंधन कार्यक्रम केला. आपल्याच वयाच्या इतर मैत्रिणींबरोबर वावरण्याचा एक आनंद त्यांना मिळाला. पुढे शिकण्याची इच्छा काही जणींनी बोलून दाखविली. एक अस्वस्थता मनात घेऊन या विद्यार्थिनी परतल्या. करण्यासारखं बरंच काही आहे असं त्यांना जाणवलं.

मित्र–मैत्रिणींनो, आपल्या सुरक्षित कोशातून बाहेर पडून आपल्या सहवासासाठी आतूर असलेल्या अशा मित्रांना भेटण्याची ही अभिनव कल्पना तुम्हालाही आवडेल ! पुढचं रक्षाबंधन तुम्हीही अशाच काही अभिनव पद्धतीनं अनुभवणार ना?

# प्रगतगावची एस्.टी.

– श्री. सुभाष देशपांडे

''गांव तिथं एस्. टी.'' अशी घोषणा ऐकल्यावर प्रगतगावची सगळी मुलं खूष झाली. आपली 'वाडी' छोटी असली म्हणून काय झालं, आज ना उद्या आपल्याकडेही एस्. टी. येणार या विचारानं पांडू हरखला होता. एरवी एस्.टी. गाठायची म्हणजे दोन कोसावरच्या वडगावपर्यंत तंगड्या तोडत पायी जायचं.

''अन् एवढं करून ती टायमाला धावेल अशी खातर न्हाय्. परगतगावाला एस्. टी. आली की वांदा नाय्. मुक्कामी एस्. टी. ची सोय लई न्यारी. सकाळी उठून गावातल्या गावात टुणकन् चढून बसायचं की चालला पुण्याला. दिसभर कामं उरकायची, दूधं घालण्यापासून आंबोणाचं पोतं खरेदी करण्यापर्यंत. संध्याकाळी सामान टपावर टाकलं की अलगद मुक्कामी गावात परत. आजारीपाजारी म्हाताऱ्यांची लय स्वय् होनार.'' तो गणप्याला म्हणाला होता.

एकूणच लाल पिवळ्या पट्ट्यांची ती 'परी' कल्पनेत का होईना, पण स्वर्गाचं सुख मिळवून देत होती.



तीन वर्षांपूर्वी वडगावला जेव्हा पहिल्यांदा एस्. टी. आली, तेव्हा बाया-माणसांनी ड्रायव्हर-कंडक्टरला ओवाळलं होतं, 'लक्ष्मी' गावात आणली म्हणून. आज जो तो उठतोय तो एस्. टी. नं रोज पुण्याला जातोय.

''अन् ऊरसाच्या वेळंला शहराकडलं पाव्हणं किती मायंदाळ ! अहो, ईस बोकड पुरला न्हाई गुदस्ता. बाटल्यांचा तर नुसता खच पडला होता. बरंचसं मोठं पाव्हणं 'जिपाड' ऊडवित आल्तं म्हना. पण साध्यासुध्या मानसांची एस्. टी. नं लई स्वय केली. येरवी कोण येतो आडरानात आमच्या गावाला. वडगाव सुधारलं तसं आमचं 'प्रगतगाव' ही सुधारनार. आता वेगळी ग्रामपंचायत मंजूर झालीय् आम्हाला'' पांडूची छाती अभिमानानं फुलली होती.

''ते खरंय् म्हना'', गणप्यानं पांडूच्या सुरात सूर मिसळला. पण न राहवून त्यानं म्हटलं, ''सुधारना झाली ह्येबी खरं हाय् आन खराबी झाली ह्येबी तितकंच खरं हाय्.'' गणप्या काळजीच्या स्वरात म्हणाला ''म्हंजी?'' पांडूच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह होतं. ''वडगावच्या शेतीत आता 'राम' राह्यला न्हाई. धाव्वी पास एक बी पोरगा गावात राह्यला मागत न्हाई. जेला तेला ब्यांकत शिपायाची नोकरी हवी. शहरात झोपडपट्टीत राहू, पन रानवाऱ्यातली शेती गोड वाटेनाशी झालीया त्येस्नी.'' गणप्यानं



सहज मिळे त्यात जीव तृप्तता न पावे । जे सुदूर, जे असाध्य तेथे मन धावे ।।

मन तळवटून सांगितलं, ‘‘म्हंजे प्रगतगावाला एस्. टी. आली तर आपल्या गावाचं बी असंच हुनार? ‘‘मोठीच अवदसा दिसतीय.’’ पांडू काळजीत पडला.

‘‘त्यात एस्. टी. चा काय दोष?’’ नुकताच ग्रॅज्युएट होऊन गावात शेती करायला परत आलेला गोविंदा म्हणाला. ‘‘असं कोड्यात टाकू नका बघा.’’ पांडू आणि गणप्या म्हणाले. ‘‘अरे, शेवटी एस्. टी. हे साधन आहे. वाहन आहे. काय आणि कशाची वाहूतक करायची हे तुमच्या आमच्या हातात आहे. एस्. टी. ला का दोष देता? ती तर गावात यायला हवीच. जगात काय सुधारणा चाललीय हे कळणार कसं त्याशिवाय आपल्याला? शहरातला दिमाख खेड्यात पन आणू आपण. शहरातला पोकळ डौल नको आपल्याला. उत्पन्नाचं साधन नाही म्हणून माणूस शहराकडे पळतोय्. खेड्यात घरच्या घरी बागायत आणि उद्योगधंदे वाढले तर कोण जाईल त्या गर्दीत चेमटायला?’’ गोविंदा आत्मविश्वासानं म्हणाला. ‘‘पण ते कसं?’’ पांडू आणि गणप्यानं एकमेकांकडे पाह्यलं.

***

## व्यक्तिमत्त्व विकसनाच्या पाऊलवाटा

‘काय सुंदर व्यक्तिमत्त्व आहे आमच्या बाईंचं ! अगदी पहिल्याच तासाला त्यांनी सर्वांना जिंकलं !’ ‘तुझ्या व्यक्तिमत्त्वामुळेच तुला ही नोकरी मिळाली.’ ‘आज काल बाकी काही नाही तरी व्यक्तिमत्त्व उठावदार हवं !’ या तीनही प्रतिक्रियांत व्यक्तिमत्त्वाचा वेगवेगळा अर्थ घेतलेला दिसतोय नाही का? मग खरंच ‘व्यक्तिमत्त्व’ म्हणतात ते काय? त्याचा एवढा ‘बागुलबुवा’ वाटण्याचं काय कारण? आपला चेहरा हे आपलं व्यक्तिमत्त्व आहे, का आपले विचार? असे अनेक विचार मनात येतात. ग्रीक भाषेत 'Persona' असा शब्द आहे. Persona म्हणजे मुखवटा! (Mask) यावरून आला Personality म्हणजेच मराठीत ‘व्यक्तिमत्त्व!’ मग ह्याचा अर्थ म्हणजे आपले ‘मुखवटे’ म्हणजे वरवर दिसणारं रूप असाच घ्यायचा का?

खरं तर व्यक्तिमत्त्व या शब्दाला खूप पैलू आहेत. सुनील उत्तम व्यायामपटू आहे. त्यानं शरीर कमावलं आहे. अनूप अगदी हळवा, संवेदनशील आहे. कुणालाही अडचणीत बघून तो चटकन मदतीला धावतो. वसुधा एक उत्तम कवयित्री आहे. अगदी सहजपणे नव्या कल्पना तिला सुचत असतात. या तिघांचेही गुण त्यांचं व्यक्तिमत्त्व दाखवणारे आहेत. पण अर्थातच प्रत्येकातच हे तीनही पैलू असतात. या तिन्हींच्या मिश्रणातून जे तयार होते ते आपलं व्यक्तिमत्त्व! शरीर, मन आणि बुद्धी यांचा मिलाप होऊन जे सामोरं येतं ते ! त्याचं दर्शन आपलं हसणं, दिसणं, चालणं यातून जसं होतं ना तसंच आपले विचार, आपली निरनिराळ्या प्रसंगातील वागणूक, आपलं बोलणं या सर्वांतूनही होत असतं. शरीर, मन आणि बुद्धी यांचं एकमेकांशी नीट पटत असेल म्हणजेच या तिन्ही गोष्टी अनुरुप असतील तर चांगलं व्यक्तिमत्त्व आकाराला येतं. ‘बोले तैसा चाले त्यांची वंदावी पाउले’ असं आपल्याकडे म्हटलं आहे ते याच करता ! एखाद्या

व्यक्तीची भाषा खूप गोड असली तरी, जर ती अप्रामाणिक असेल तर त्या गोडव्याचा काय उपयोग? एखाद्या दुबळ्या कमजोर माणसानं कुस्तीची वल्गना केली तर त्याचं हसंच होईल. शरीराची सुदृढता आणि मनाचा समतोलपणा हे जसे उत्तम व्यक्तिमत्त्वाला आवश्यक आहेत तसंच तेजस्वी बुद्धी ही आपल्या व्यक्तित्त्वाला एक वेगळीच झळाळी देते. कोणत्याही प्रसंगी प्रश्न सोडविण्याचे मार्ग दाखवते. नवनवीन कल्पनांनी आणि विचारांनी आयुष्याला एक निराळीच गोडी लाभते. काही व्यक्तिमत्त्व खरोखरच खूप प्रभावी असतात. प्र. के. अत्रे, गांधीजी, अब्राहम लिंकन, अटलबिहारी, पु. ल. देशपांडे, भालजी पेंढारकर अशी विविध क्षेत्रातील अनेक नावं घेता येतील. त्यांचं यश हेच काही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचं मोजमाप आहे असं नाही. तर त्यांच्या असाधारण वैशिष्ट्यामुळे त्यांचं व्यक्तिमत्त्व शेकडो, हजारो जणांमध्ये उठून दिसणारं ठरलं.

उत्तम व्यक्ती बनायचं असेल तर काय काय केलं पाहिजे? शारीरिक, मानसिक, बौद्धिक विकास जसा आवश्यक आहे तसाच आपण समाजाचा एक घटक आहोत ही जाणीव ठेवली पाहिजे. व्यक्तिगत यशाच्या पायऱ्या चढतानाच आसपासच्या लोकांनाही हात देता आला पाहिजे.

हे सर्व कसं जमेल? आपले प्रयत्न गुरुजनांची आणि आई वडिलांची प्रेमळ आश्वासक साथ आणि आपल्या मित्रमंडळींची सोबत या सर्वांतून आपण हे उत्तम व्यक्तिमत्त्वाचे पुष्प उमलवू शकू!

***


## शरीर सतेज सुदृढ

## भुजंगासन

नागसर्पाप्रमाणे फण्यासहित डोके, छाती इत्यादी पुढे आणून केल्याने भुजंगाप्रमाणे दिसते म्हणून यास हे नाव दिले आहे.

**कृती :** पालथे निजा. हात खाली आणून कोपरात वाकवा आणि तळहात शेवटच्या बरगड्यांपाशी जमिनीवर ठेवा. पाय सरळ व ताठ, गुडघे व घोटा जुळलेला ठेवावा. मग हाताने जोर न लावता छाती सावकाश वर उचला. (नाग फणा काढतो त्याप्रमाणे) मान मागे नेऊन छाती वर काढा. मान इतकी मागे न्या की खोलीचे छत दिसू लागेल. पाठीच्या कण्याला सुंदर गोलाकार येऊ द्या. काही वेळ श्वसन करीत थांबा नि उलट क्रमाने सावकाश पूर्वस्थितीत या. हिसका देत आसन करू नका.

**फायदा :** छाती रुंदावते, मनगटे बळकट होतात. पाठीच्या कण्यावर दाब आल्याने तो सक्षम बनतो. अतिश्रमामुळे होणारी पाठदुखी थांबते. पोट आणि कमरेचा घेर कमी होतो. टॉन्सिलचा त्रास दूर होतो. छातीत चमक भरणे, कळा येणे वगैरे तक्रारी दूर होतात.



## सांगा कसं जगायचं ?

सांगा कसं जगायचं?
कण्हत कण्हत की गाणं म्हणत
तुम्हीच ठरवा !
डोळे भरून तुमची आठवण
कोणीतरी काढतंच ना?
ऊन ऊन दोन घास
तुमच्यासाठी वाढतंच ना?
शाप देत बसायचं की दुवा देत हसायचं?
तुम्हीच ठरवा ! सांगा कसं जगायचं?
कण्हत कण्हत की गाणं म्हणत
तुम्हीच ठरवा !
काळ्याकुट्ट काळोखात
जेव्हा काही दिसत नसतं,
तुमच्यासाठी कोणीतरी
दिवा घेऊन उभं असतं !
काळोखात कुढायचं की प्रकाशात उडायचं?
तुम्हीच ठरवा ! सांगा कसं जगायचं?
कण्हत कण्हत की गाणं म्हणत?
तुम्हीच ठरवा!

पायात काटे रुतून बसतात
हे अगदी खरं असतं;
आणि फुलं फुलून येतात
हे काय खरं नसतं?
काट्यासारखं सलायचं की
फुलासारखं फुलायचं?
तुम्हीच ठरवा! सांगा कसं जगायचं?
कण्हत कण्हत की गाणं म्हणत?
तुम्हीच ठरवा !
पेला अर्धा सरला आहे
असंसुद्धा म्हणता येतं;
पेला अर्धा भरला आहे
असंसुद्धा म्हणता येतं!
सरला आहे म्हणायचं
की भरला आहे म्हणायचं?
तुम्हीच ठरवा! सांगा कसं जगायचं?
कण्हत कण्हत की गाणं म्हणत
तुम्हीच ठरवा!

**कवी : मंगेश पाडगावकर**

---

## ...आठवणी

**रसिका चिकटे,** ९ वी ज्ञान प्रबोधिनी

वाऱ्याच्या मंद झुळुकीसारख्या
मनाला सुखावून जातात
ओल्या ओल्या मृद्‌गंधासारख्या
चित्तात दरवळून जातात. . . आठवणी

पावसाच्या टपोऱ्या थेंबासारख्या
हृदयाला भिजवून जातात
उमलणाऱ्या गुलाबकळीसारख्या
खुदकन हसतात. . . आठवणी

गाण्यातल्या सुरेल सरावटीसारख्या
मनात लयबद्ध होतात
गतकालाच्या रम्यविश्वात
लपत छपत डोकावतात. . . आठवणी

# सामाजिक बुद्धिमत्ता म्हणजे काय?

**– मानसी राजहंस**

मागील अंकात आपण सामाजिक प्रज्ञेची सर्वसाधारण रुपरेषा जाणून घेतली. या अंकात सामाजिक प्रज्ञा म्हणजे नेमके काय असते, याविषयी अधिक माहिती करून घेऊ.

सामाजिक प्रज्ञा नावाची इतर बुद्धिमत्तेपेक्षा वेगळी बुद्धिमत्ता लोकांमध्ये असते, हे सर्वप्रथम थॉर्नडाइक या मानसशास्त्रज्ञाने १९२० मध्ये मांडले. लोकांना समजून घेणे, त्यांचे व्यवस्थापन करणे आणि सामाजिक संबंधांमध्ये शहाणपणाने वागणे यासाठी लागणाऱ्या क्षमता म्हणजे सामाजिक प्रज्ञा अशी या प्रज्ञेची व्याख्या त्याने केली. अगदी अलिकडे म्हणजे १९८५ मध्ये गार्डनर या शास्त्रज्ञाने या प्रज्ञेची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. 'सामाजिक प्रज्ञा म्हणजे लोकांचे हेतू, प्रेरणा, मन:स्थिती व स्वभाव ओळखण्याची व या चार घटकांनुसार वेगवेगळ्या लोकांमध्ये फरक करण्याची क्षमता.'

ही प्रज्ञा म्हणजे नेमके काय, हे निश्चितपणे सांगता येणे कठीण झाले आहे. तरीही थोडक्यात सांगता येईल की, विविध प्रकारच्या माणसांना जाणून घेणे, त्यांच्याशी संपर्क प्रस्थापित करू शकणे. सामाजिक संबंधामध्ये शहाणपणाने वागणे व लोकांशी संबंधित असलेल्या प्रश्नांची योग्य रीतीने उकल करणे म्हणजे सामाजिक प्रज्ञा होय.

या प्रज्ञेशी संबंधित असलेल्या काही स्वतंत्र क्षमता लोकांमध्ये असतात असे दिसून येते. उदा. काही व्यक्ती विचारानेही इतरांच्या भावना, त्यांची संवेदना वा त्यांचे विचार जाणून घेऊ शकतात. एखाद्या प्रसंगाच्या नुसत्या चर्चेवरूनही त्यातील व्यक्तींच्या मनात काय चालले असेल. याचा अंदाज त्यांना झटकन बांधता येतो. अशा व्यक्तींकडे empathy म्हणजे रूढार्थाने सहानुभूती जास्त असते. ही सहानुभूती म्हणजेच दुसऱ्याला जाणून घेण्याची क्षमता, सामाजिक प्रज्ञेचा हा एक भाग आहे असे म्हणता येईल; परंतु सहानुभूती म्हणजे संपूर्ण सामाजिक प्रज्ञा नव्हे.

समाजात आपल्याला अत्यंत स्मार्ट अशा काही व्यक्ती दिसतात. या व्यक्ती त्यांचे म्हणणे अत्यंत प्रभावीपणे मांडतात. कोणत्याही सामाजिक प्रसंगात त्यांचे बोलणे व वागणे अत्यंत सहज वाटते. तेव्हाचे त्यांचे अस्तित्व अगदी उठून दिसते. अशा व्यक्तींकडे सामाजिक कौशल्ये अधिक प्रमाणात असतात. मात्र त्यांच्याकडे सामाजिक प्रज्ञा जास्त असेलच असे सांगता येत नाही.

काही माणसे अत्यंत धूर्त व स्वार्थी असतात. दर वेळी नवी खेळी करून त्यांना हवी असलेली गोष्ट ती इतरांमार्फत करवून घेतात. असे करत असताना इतरांना त्यांचा वापर केला गेला आहे, याची यत्किंचितही जाणीव ते होऊ देत नाहीत. अशा व्यक्तींसाठी आपण राजकारणी हा शब्दही वाईट अर्थाने वापरतो. अशा लोकांकडे जी काही सामाजिक प्रज्ञा असते, तिचा उपयोग ते केवळ वैयक्तिक स्वार्थासाठी करतात. म्हणून फक्त धूर्तपणा म्हणजेच सामाजिक

प्रज्ञा नव्हे. अशा रीतीने सहानुभूती, सामाजिक कौशल्ये, धूर्तपणा या अशा काही संकल्पना आहेत की ज्यांचे सामाजिक प्रज्ञेशी थोडेफार नाते आहे परंतु सामाजिक प्रज्ञा ही संकल्पना अधिक व्यापक आहे व तिच्यात आधी निर्देश केलेल्या अनेक क्षमतांचा समावेश होतो.

मागील अंकात सांगितल्याप्रमाणे गिलफोर्ड या मानसशास्त्रज्ञाने या प्रज्ञेचे तीस पैलू सांगितले आहेत. ज्ञान प्रबोधिनीच्या प्रज्ञा-मानस-संशोधिकेत या पैलूंच्या मापनासंबंधी पुढील संशोधन चालू आहे. येथे आपण गिलफोर्ड यांनी मांडलेल्या या प्रज्ञेच्या संकल्पनेचा थोडा तपशिलात परिचय करून घेऊ.

गिलफोर्ड यांनी सांगितलेल्या तीस पैलूंचे मुख्य पाच प्रकारात विभाजन करून प्रत्येक प्रकाराच्या क्षमतेची आपल्याला आणखी ओळख करून घेता येईल. या प्रकारच्या क्षमता पुढीलप्रमाणे आहेत.

**१. वर्तन आकलन** – इतरांचे वर्तन ओळखणे.

**२. वर्तन-स्मृती** – इतरांचे वर्तन लक्षात ठेवणे.

**३. वर्तन-बहुदिशविचार** – इतरांच्या वर्तनाविषयी अनेक बाजूंनी विचार करणे.

**४. वर्तन-एकदिशविचार** – इतरांच्या वर्तना-विषयी एका विशिष्ट दिशेनेच विचार करणे.

**५. वर्तन-मूल्यमापन** – इतरांच्या वर्तनाचे मूल्यमापन करणे.

यापैकी पहिल्या प्रकारातील क्षमतांमध्ये दुसऱ्यांच्या भावना, विचार, हेतू, मन:स्थिती, स्वभाव इत्यादी जाणून घेण्याच्या क्षमतांचा समावेश होतो. जिथे जिथे माणसांशी आपला संबंध येतो, तिथे तिथे त्यांच्या मानसिकतेचे ज्ञान होणे उपयुक्त ठरते. दुसऱ्यामधील आनंद, दु:ख, राग, भिती अशा काही भावना आपल्याला सहज ओळखता येतात; परंतु असूया, मत्सर, हेवा, स्पर्धा या भावछटा ओळखणे कठीण जाते. तसेच काही व्यक्तींचे व्यक्तिमत्त्व आपल्याला चटकन समजते परंतु काही व्यक्ती आपल्याला अगदी अनाकलनीय वाटतात. अशा समजण्यास अवघड असलेल्या व्यक्तींविषयी निश्चित माहिती करून घेण्यासाठी अधिक प्रज्ञेची आवश्यकता असते.

दुसऱ्या प्रकारची क्षमता म्हणजे इतरांचे हेतू, भावना, विचार इ. लक्षात ठेवण्याची क्षमता. ही एक प्रकारची स्मरणशक्तीच होय. ज्या लोकांना वस्तूंपेक्षा, भौतिक जगापेक्षा माणसांमध्ये अधिक रूची असते, अशा व्यक्तींकडे ही वर्तन-स्मृती अधिक असते. अशी स्मृती जास्त प्रमाणात असणे हे काही व्यावसायिकांच्या यशासाठी आवश्यक असते. उदा.-नेते, राज्यकर्ते, व्यवस्थापक, शिक्षक, डॉक्टर्स यांच्याकडे अशी स्मृती अधिक असल्यास म्हणजेच त्यांच्या संपर्कात येणाऱ्या व्यक्तींचे आधीचे वर्तन त्यांच्या पुरेसे लक्षात असल्यास त्यांच्याशी संबंध प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने त्यांना खूप फायदा होतो.

तिसऱ्या प्रकारची क्षमता म्हणजे मानवी वर्तनाचा अनेक अंगांनी विचार करण्याची क्षमता होय. माणसांमुळे तयार होणाऱ्या प्रश्नांची उत्तरे शोधताना या क्षमतेचा उपयोग होतो. मानवी एकसंघपणाकरिता सरदार

*(पान क्र. २७ वर पुढे चालू)*

# असंही जगणं असतं

## *अजूनही आठवतात आकडे २५ + २६, मिळून ५१!*

झालो एकदाचा मॅट्रिक तेही शेकंड क्लासमध्ये पास. मग सारखा ध्यास लागला की काय करायचे पुढे म्हणून. माझ्या बरोबरीची मुलं कोणी कुठं कोणी कुठं जायचं ठरवत होती. मीही मनात खूप विचार करीत होतो पण विचार बाहेर येत नव्हता. शेवटी एकदाचं गावात चंदा गोळा करून कॉलेजला येण्याची तयारी पूर्ण झाली. एरवी कामापुढे वेळच कुठे असायचा – पहातो तर पायावर जिकडे तिकडे काळे डाग ! एका दिवशी दुपारी सहजच दोन्ही पाय स्वच्छ धुतले.

एकामागून एक असे ते काळे डाग कोरले तर एका पायात २५ काटे तर दुसऱ्यात २६ काटे असे एकूण ५१ काटे निघाले. दोन्ही पाय ठणकू लागले.

इतके दिवस मात्र सारा सरावच पडला होता याचा. अर्थ हाच की मी मॅट्रीक पास होईपर्यंत चप्पल किंवा जोडा म्हणायची वस्तू पाहिलीच नाही व कधी काटा टोचला तर कधी काढावे तर कधी तसेच दुर्लक्ष करावे याच्यातून शेवटी ५१ काट्यांचे माहेर म्हणजे माझे पाय बनले होते.

मी पहिली चप्पल पाहिली ती फक्त औरंगाबादला मिलिंद महाविद्यालयात प्रवेश घेतल्यावर. सारेच मोठ्या थाटात पाहून मित्रांनी ''घे कशीतरी कपटाफिफटाची निभावण्यापुरती'' म्हटल्यावर ! चप्पल घेतल्यावर थोडंसं वेगळं चालणं झालं कारण चप्पल कितीही म्हटलं तर उंचच व आतापर्यंत पायात काही न घालता चालायची सवय होती. काही दिवस खूप कुतूहल व नवल वाटत राहिलं. माझ्या मनालाच जरा ऐटीत चालल्यासारखं वाटलं पण कसची ऐट नि थाट. मधून सारं खपट असल्यामुळे व आत सारे खिळे ठोकले असल्यामुळे ते टोचायला लागले व टोचला म्हणून चप्पल काढून पहायला लागलो की पुन: तो दिसायचाच नाही. पायाचं वजन पडलं की तो टोचायचा व आधीच काटे काढल्यामुळे व खड्डे झाल्यामुळे पाय दुखायचे म्हणून मी कधीकधी खिळे रूततात म्हणून तसाच चप्पल न घालता कॉलेजला व इतरही ठिकाणी जात असे.

ती अशी पहिलीच टोचणारी चप्पल. ती होती दोन रूपयांची. मग मला वाटायचे दोन रुपयांच्या चप्पलने टोचण्याशिवाय करावे तरी काय? काय चुकते त्या चप्पलचे? तिला तयार करणाऱ्याचे व तिला ठेवणाऱ्याचेही. सगळ्याच गोष्टी नाईलाज म्हणून झालेल्या.

असे ते दोन पायातील २५+२६ मिळून ५१ काटे व पहिल्या चप्पलेतले काट्यांपेक्षा ताठ असलेले व काट्यांची आठवण करून देणारे खिळे. सारंच आठवतं अजूनही जखमा झाल्यामुळे.

**

(‘आठवणींचे पक्षी’ या प्रा. प्र. इ. सोनकांबळे यांच्या आत्मकथनपर पुस्तकातून.)

असंही जगणं असतं ! या सदरातील छोटा उतारा वाचलात ना ! प्रसंग अगदी साधा तरी अतिशय बोलका. तुम्ही आम्ही चप्पल हा आमच्या पेहेरावाचा एक आवश्यक भाग म्हणून वापरतो. तर असे अनेक प्रल्हाद असतील की ज्यांच्या दृष्टीने चप्पल वापरणं ही चैन असेल. शेतात काम करताना बोचणारे काटे त्यामुळे झालेल्या जखमा आणि खिळे ठोकलेली स्वस्तातली पहिली वहिली चप्पल–मनाला सुखावणारी तर पायाला वेदना देणारी. असे अनेक भयानक, खडतर अनुभव 'आठवणींचे पक्षी' या पुस्तकात भेटतात. पण ना कुठे कडवटपणा ना भडकपणा !

दलित साहित्यातून चितारल्या गेलेल्या वास्तवाच्या पसाऱ्यात या परिपक्वतेमुळे आठवणींचे पक्षी हे प्र. इ. सोनकांबळे यांचे अनुभवकथन मनाला भावते. दलित जीवनाची अंतररूपे ते सहजपणे व्यक्त करतात.

पोटात कायमची भूक आहे. बहिणीकडे रहात असताना पडेल ते काम केले पाहिजे ही जाण मनात आहे. परीक्षा द्यायला मोठ्या गावात गेल्यावर जवळ भाकरी नाही. मित्रांनी खाऊ घातल्यावर उरलेला भाकरीचा चुरा खिशात ठेवून तो मित्रांना समजू न देता चोरून खातो. पोटात सतत भूक आहे आणि बहीण मटण खाण्याचा आग्रह करते पण लहानगा प्रल्हाद गळ्यात माळ आहे म्हणून ते नाकारतो. हा त्याचा नकार किती मोठा आहे ते फक्त भुकेला माणूसच समजू शकेल. मित्र रंगपंचमी मजेत खेळतायत तर प्रल्हादाचे लक्ष रंगाने भरलेले जुने कपडे श्रीमंत मित्र टाकून देतो ते कसे मिळवता येतील, धुऊन वापरता येतील याकडे लागलेले. मित्राचा निरोप घेऊन प्रल्हाद आपल्या गावी घराकडे निघालेला असतो. मित्राची बहीण नांदायला निघालेली असते. महार आडवा आला. अशुभ आडवे आले असे वाटून सर्वांना वाईट वाटते. त्या मुलीचे सासरी जाणे रद्द होते. लेखक आपल्या अशा अनेक व्यथा संघर्ष न वाढवता सहज सांगतो.

चतकोर भाकरीसाठी छोटा प्रल्हाद मेलेले कुत्रे नाक दाबत ओढत नेतो. तरीही नंतर भाकरी मात्र मिळत नाही.

संपूर्ण पुस्तक वाचताना जाणवतो तो लेखकाच्या मनाचा सरळपणा. आक्रोश नाही, तक्रार नाही तरीही वाचकाचे अंत:करण हेलावून सोडणारे अनेक अनुभव येथे आहेत. असे अनुभव घेत मोठा होत जाणारा प्रल्हाद. त्याच्या मनाचा प्रांजळपणा मनाला भावतो. म्हणून प्रा. प्र. इ. सोनकांबळे यांचे 'आठवणींचे पक्षी' हे पुस्तक प्रत्येकाने वाचायलाच हवे. कारण भडकनाट्याचा आधार न घेता व्यक्त केलेले स्वत:चे अनुभव इथे तुम्हाला 'असंही जगणं असतं' असं सांगत वेगळ्या जगात नेतात.

***

# *आम्हीच लिहिणार आमचे पान !*

## आपली माता

आपली ही भारतमाता,
जिचा आपणास गर्व,
जिच्या कुशीत नांदतो,
सुखाने आपण सर्व !
तिची लेकरे सर्व आम्ही,
तिचा आम्हा अभिमान,
सदैव आहो तयार आम्ही,
तिच्यासाठी देण्यास बलिदान !
होऊन गेले येथे थोर,
ज्यांनी केली हिची मुक्ती,
आजही करतो आम्ही,
त्यांची सदैव भक्ती !
होऊनी आज आनंदी,
करू या भारतीयम्,
गाऊ या आपण सर्व,
जय जय वन्दे मातरम् !

– **अभिजित मेहता,** ज्ञा. प्र. निगडी

---

छापील मजकुर नच हा केवळ,
हृदयांतरीचे असती बोल,
त्रस्त देश अन् समाज यास्तव,
परिश्रमांचे देऊ मोल,
प्रकाश आणि पराक्रमाने
दूर करू घन तम सारा,
बोलविण्याची वाट न पाहू
जशा वर्षती जलधारा,
धन मन तन हे देशासाठी
अशी प्रतिज्ञा चला करू,
न चा पाढा गाळून टाकू
ध्वज देशाचा उंच धरू.


– **अविनाश गोडबोले,** सोलापूर

## वृक्षारोपण

कावळा म्हणतो काव काव,
म्हणतो माणसा झाड लाव !
माणसा माणसा वेळ काढ,
एकतरी बाबा झाड लाव !
झाड म्हणतं या रे या,
फळे, फुले, सावली घ्या !
आपापल्या घरोघरी,
झाड लावा एकतरी !
आपापल्या शेतावरी,
झाड लाव शेकड्यावरी !

– **कु. संध्या जिवडे,** ज्ञा. प्र. निगडी

---




**आडवे शब्द :** १. धनुष्यबाण ४. रक्तवाहिन्या ६. आजूबाजूला ८. रक्षण १०. 'म्हणणे' याला संस्कृत क्रियापद ११. नाव १२. पूर्वीच्या काळची लेखणी १३. 'सत्य' याला हिंदी शब्द १४. संगीतातील षड्ज

**उभे शब्द :** १. बट्ट्याबोळ होणे, नुकसान होणे याअर्थी एक वाक्प्रचार २. प्रत्येक फळात हा असतोच ३. मनातील विचार ५. सैन्याचा दाणागोटा ६. शपथ ७. अग्नी ९. दगडाचे बारीक तुकडे १२. तळपायाचा एक भाग

– **प्रसन्न कुलकर्णी,** ८ वी, धुळे

**Dictionary is the only place where SUCCESS comes before WORK**

प फ ष ण व ब क च घ ध ल ळ छ ख य थ प व य

थ य ख छ ळ ल ध घ च क ब व ण ष फ प क ख ळ

प पा पि पी पु पू पे पै पो पौ पं पः फ फा फि फी फु फू फे

फै फो फौ फं फः ष षा षि षी षु षू षे षै षो षौ षं षः ण णा

णि णी णु णू णे णै णो णौ णं णः व वा वि वी वु वू वे वै वो

चार चौघे चिंचोका पंच चांभार चक्क चित्ता

घूस पांघरूण घृष्णेश्वर बंधू शोध पर्धा धनुर्वात

कौल लवंग लावून कैलास विपुल ब्लीचिंग प्लग

घोळ शेळी रूळ धर्मशाळा चंगळ वर्तुळाकार

छत छळ छुमछुम स्वच्छ छप्पर श्वासोच्छ्वास

चौखूर शंख मूर्ख घरखर्च खंबीरपणा लख्ख

थेंब यथासांग व्यर्थ मिथ्या स्थायी व्यवस्था

यथार्थ ध्यानस्थ पृथ्वी चित्तथरारक स्थायिक

छो छौ छं छः ख खा खि खी खु खू खे खै खो खौ खं खः य या यि

यी यु यू ये यै यो यौ यं यः थ था थि थी थु थू थे थै थो थौ

थं थः ग मा भि नी टु रू से शै पो फौ षं णः व बा कि ची घु

पाते निरोप परंतु रूपांतर स्पर्श गुप्त प्रसन्नता

नफा फी फुगा गुंफा फ्रान्स स्फूर्ती फर्मान माफी

भाषा मनीषा रेष सप्तर्षी पौष पोषण भीषण

बतावणी किताब काव विकास निष्कर्ष कारण

वौ वं वः ब बा बि बी बु बू बे बै बो बौ बं बः क का कि की

कु कू के कै को कौ कं कः च चा चि ची चु चू चे चै चो चौ चं

चः घ घा घि घी घु घू घे घै घो घौ घं घः ध धा धि धी धु धू

धे धै धो धौ धं धः ल ला लि ली लु लू ले लै लो लौ लं लः ळ

ळा ळि ळी ळु ळू ळे ळै ळो ळौ ळं ळः छ छा छि छी छु छू छे छै

# अभ्यासातील स्वावलंबन...... प्रश्नकौशल्याचा वापर

**भाग २**

## `लघुत्तरी प्रश्न`

– डॉ. नलिनी गुजराथी

पहिल्या भागामध्ये आपण वस्तुनिष्ठ प्रश्नांचे विविध प्रकार पाहिले होते. या भागामध्ये लघुत्तरी प्रश्न कसे काढायचे हे पाहू या. लघुत्तरी प्रश्नाचे उत्तर चार–सहा वाक्यांपासून ते आठ–दहा वाक्यांपर्यंतच्या एखाद्या परिच्छेदाएवढे द्यावे लागते. लघुत्तरी प्रश्नांचे प्रकार पाहण्यासाठी तुमच्या कोणत्याही विषयाचे पाठ्यपुस्तक घ्या आणि प्रत्येक धड्याखाली जो स्वाध्याय दिलेला असतो त्यावर नजर टाका. लघुत्तरी प्रश्नांचे अनेक नमुने तुम्हाला मिळून जातील. उदा. १) फरक स्पष्ट करा. २) कारणे द्या ३) नियम किंवा संकल्पना सोदाहरण स्पष्ट करा. ४) थोडक्यात उत्तरे लिहा. ५) थोडक्यात टीपा लिहा. ६) संदर्भासहित स्पष्टीकरण करा.

हे सर्व प्रश्न तुम्हाला पाठाचे आकलन झाले आहे की नाही हे पाहण्यासाठी विचारले जातात. वस्तुनिष्ठ प्रश्नांमध्ये तुम्हाला कितपत समजले आहे हे पाहिले जाते परंतु लघुत्तरी प्रश्नांमध्ये मात्र तुम्हाला जे काही समजले आहे ते तुमच्या शब्दात, काही वाक्यांमध्ये सलगपणे मांडता यावे अशी अपेक्षा असते.

वरील लघुत्तरी प्रश्नांची काही उदाहरणे पाहू या. फरक स्पष्ट करा. या प्रकारचा प्रश्न साधारणपणे रसायन, जीवशास्त्र इ. शास्त्रविषयांमध्ये विचारला जातो.

उदा. १) अदिश राशी व सदिश राशी
२) 'उत्कलन' आणि 'बाष्पीभवन'
३) 'अणु' व 'आयन' इ. फरक स्पष्ट करा.

या तऱ्हेचे प्रश्न तयार करण्यासाठी धड्यामध्ये जेथे दोन वस्तूंची, पदार्थांची, प्रक्रियांची तुलना केलेली असते तो भाग तुमच्या ध्यानात यायला हवा. फरकाचे एकूण किती मुद्दे सांगितले आहेत. ते लक्षात घेऊन सर्व मुद्यांचे थोडक्यात दोन भाग पाडून टिपण तयार करा. प्रत्येक मुद्यातील महत्त्वाचे शब्द अधोरेखित करून ठेवा. फरक सांगत असताना काही मुद्दे हे किरकोळ फरक सांगणारे असतात तर काही मुद्दे हे महत्त्वाचे, वैशिष्टयपूर्ण, ठळकपणे वेगळेपणा जाणवणारे असे फरक सांगणारे असतात. जेव्हा तीन–चारच फरक लिहायचे असतील तेव्हा वैशिष्ट्यपूर्ण असे फरक तुम्हाला पाठामधून निवडता आले पाहिजेत.

'कारणे द्या' हा प्रश्न रसायन, जीवशास्त्र इ. शास्त्रे व इतिहास, भूगोल इ. सामाजिक शास्त्रे यामध्ये जास्त करून विचारला जातो.

उदा. १) औद्योगिक क्रांतीमुळे नवीन शहरे उदयास आली. २) युरोपच्या इतिहासात १८४८ हे साल अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. ३) सोडिअम धातू नेहमी केरोसिनमध्ये ठेवतात. वरील उदाहरणांवरून हे आपल्या लक्षात येईल की या प्रकारच्या प्रश्नांची उत्तरे देताना संबंधित घटनेमधील कार्यकारणभाव

हा पूर्णपणे उलगडून दाखविणे अपेक्षित आहे. अनेकदा विद्यार्थी खूप मोघम कारण सांगतात. उदा. सोडिअम धातू केरोसिनमध्ये ठेवतात. याचे कारण सांगताना सोडियम धातू खूप क्रियाशील आहे एवढेच उत्तर लिहून मोकळे होतात. येथे सोडियमची हवेतील प्राणवायूशी किंवा पाण्यातील प्राणवायूशी कोणती रासायनिक क्रिया घडते हे समीकरणासहित सांगायला हवे. त्यानंतर केरोसिन हे हायड्रोकार्बन असल्यामुळे त्यात ऑक्सिजन किंवा प्राणवायू हा क्रियाशील घटक नसतो. त्यामुळे सोडियमची केरोसिनशी कोणतीही रासायनिक क्रिया होत नाही. हे स्पष्ट करायला हवे. थोडक्यात म्हणजे मोघम कारणे देऊन भागणार नाही तर त्यांचे तपशीलवार नेमके स्पष्टीकरण करणे आवश्यक ठरते, हे ध्यानात यायला हवे.

लघुत्तरी प्रश्नांचा तिसरा प्रकार नियम किंवा संकल्पना सोदाहरण स्पष्ट करा हा आहे. हा प्रश्नही साधारणपणे शास्त्र विषयात विचारला जातो. उदा. १) अणु संकल्पना सांगा २) न्यूटनचे गतिविषयक नियम लिहा. ३) आर्किमिडीजचे तत्त्व सांगा. इ. या प्रकारच्या प्रश्नांची उत्तरे लिहिताना अतिशय नेमकेपणा लागतो. विशेषत: नियम देताना ते पुस्तकात जसे दिले आहेत तसेच द्यायला हवेत. यासाठी असे नियम तोंडपाठ असणेच आवश्यक आहे.

यानंतरचा लघुत्तरी प्रश्नांचा प्रकार म्हणजे 'थोडक्यात उत्तरे द्या' हा प्रश्न भाषा, शास्त्रे व सामाजिक शास्त्रे इ. बहुतेक सर्व विषयांमध्ये विचारला जातो. उदा. १) औद्योगिक क्रांतीचे प्रमुख चार परिणाम सांगा. २) वंगभंग आंदोलनात राष्ट्रीय सभेने पुरस्कृत केलेली चतु:सूत्री कोणती? ३) क्लोरिनचे उपयोग कोणते? ४) भिंगाची शक्ती म्हणजे काय? तिचे एकक कोणते? इ. अशा तऱ्हेच्या प्रश्नांची उत्तरे लिहिताना उत्तरामध्ये कोणकोणते मुद्दे यायला हवेत ते पाहा. उत्तर स्वत:च्या भाषेत लिहा. पुस्तकातील वाक्ये जशीच्या तशी उत्तरांमध्ये लिहू नका.

'थोडक्यात टीपा लिहा' हा थोडक्यात उत्तरे द्या' सारखाच प्रश्न आहे. उदा. १) बोस्टन टी पार्टी २) वायूचे विसरण ३) तुरटीची लाही ४) पाण्याचे असंगत आचरण इ. टीपा लिहीत असताना घडलेल्या घटनेचे किंवा प्रक्रियेचे तपशीलामध्ये स्पष्टीकरण करता येणे आवश्यक आहे.

लघुत्तरी प्रश्नांचा सहावा प्रकार संदर्भासहित स्पष्टीकरण करा. हा मराठी, हिंदी इ. भाषांमध्ये तसेच इतिहासामध्ये विचारला जातो. उदा. १) 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे.' २) 'झार मुर्दाबाद, शांती हवी – युद्ध नको, भाकरी हवी', अशा प्रश्नांची उत्तरे लिहीत असताना प्रथम ते वाक्य कोणी, कोणास, कोणत्या प्रसंगी म्हटले आहे त्याचे स्वत:च्या शब्दात स्पष्टीकरण करावे लागते.

याखेरीज त्या त्या विषयानुसार वेगळ्या स्वरूपाचे लघुत्तरी प्रश्न तयार केलेले दिसतात. उदा. रसायनामध्ये 'पुढील अभिक्रियेचे रासायनिक समीकरण द्या' हा प्रश्न समीकरणांवर आधारित आहे. विविध धातूंचे/संयुगांचे उपयोग सांगा.

*(पान क्र. २३ वर खाली चालू)*

# गणपतीपुढील सजावट

– सौ. रेखा जोशी

गणपती हा घरचा असो, वाड्यातला असो की अपार्टमेन्ट, को-ऑपरेटिव्ह सोसायट्यातील असो किंवा शाळेतील असो त्याला सजावट पाहिजेच. ही सजावट करताना क्रेप कागद, कलाबूत, घोटीव कागद, थर्मोकोल, फुले, खळ, डिंक, फेव्हिकॉल ही साधने आवश्यक आहेत.

क्रेपपेपरच्या तयार रिबन्स मिळतात. पताका हंड्या मिळतात त्यांचाही वापर करता येतो. गणपतीपुढे थर्मोकोल विविध आकारात कापून त्यापासून मंदिर, दालने, कळस, मखर वगैरे करता येते पण थर्मोकोलचा वापर तसा फारच सर्व सामान्य झालेला आहे.


गणपतीपुढे रांगोळी हा एक उत्कृष्ट व भारतीय परंपरेतील पूर्वापार पासून चालत आलेला प्रकार आहे. ठिपक्यांची रांगोळी तसेच विविध निसर्गदृश्ये यामध्ये काढता येतात. काही दिवसांपूर्वी गणपतीपुढे पाण्यातील रांगोळी हा एक उत्कृष्ट प्रकार फारच लोकप्रिय झाला होता. ही रांगोळी काढताना एका मोठ्या परातीत पाणी घ्या. ते पाणी स्थिर झाल्यावर त्यावर कोळशाची पूड टाकून थर द्या. त्यानंतर कागदाला घडी घालून विविध आकारात तो कापून स्टेन्सिल्स तयार करा. आता तो कागद संपूर्ण उलगडून काळ्या भुकटीवर पसरा. त्याच्यावर बाजारात 'लेक' कलरचे खडे मिळतात ते वेगवेगळ्या रंगात आणून त्याची भुकटी करून या स्टेन्सील वरून पसरा. हे खडे चमकदार असल्याने त्याची भुकटी ही चमकदार होते. त्यामुळे ही नक्षी सुंदर व उठावदार होते. साधे रांगोळीचे रंग वापरले तरी चालू शकते. पाणी जितका वेळ स्थिर राहील तेवढा वेळ ही रांगोळी छान राहाते. याशिवाय गेरू किंवा कावेच्या साहाय्याने फरशी रंगवून त्यावर तांदळाच्या पिठाची पेस्ट करून घेऊन तिने आकर्षक पिठाची रांगोळी काढावी ही पुष्कळ दिवस टिकते. विविध रंगी धान्यांची रांगोळी, विविध रंगांची पाने, फुले किंवा फुलांच्या पाकळ्या घेऊन सुद्धा सुंदर रांगोळी काढता येते.

ओरीगामीचे विविध प्रकार करून त्यांच्या साहाय्यानेही देखावा तयार करता येतील.

---

*(पान क्र. २२ वरून चालू)*

असाही प्रश्न रसायनात दिसतो. 'पाऱ्यावर संहत नायट्रिक आम्लाची काय क्रिया होते?' यासारखे प्रश्न रासायनिक अभिक्रियेवर आधारित आहेत. विज्ञानामध्ये सूत्रांवर आधारित गणिते किंवा उदाहरणे सोडवावी लागतात. उदा. एक चेंडू ४९ मीटर/सेकंद (m/s) वेगाने उर्ध्वदिशेला फेकला असता तो किती उंच जाईल? ($g=9.8m/s^2$) आत्तापर्यंत विविध लघुत्तरी प्रश्नांचे स्वरूप आपण पाहिले. प्रत्येक विषयांतील काही पाठांचा अभ्यास करून त्यातील लघुत्तरी प्रश्नांचे स्वरूप आपण पाहिले. प्रत्येक विषयांतील काही पाठांचा अभ्यास करून त्यातील लघुत्तरी प्रश्नांची उत्तरे तंत्रशुद्ध रीतीने लिहिण्याचा सराव करा. पुढील अंकात आपण दीर्घोत्तरी प्रश्नांचा विचार करू.



वापरलेल्या जुन्या वह्यातील पुठ्ठे घेऊन त्याच्या चांदणीसारखा किंवा अन्य कोणताही आकर्षक आकार घेऊन त्यावर सुंदर रंगातील घोटीव कागद चिकटवा व त्यावर खळीचा अगदी पुसटसा हात फिरवून चमकी पसरा. बाजारात विविध रंगात चमकी मिळते. ती एकमेकात मिसळून लावली तरी चांगली दिसते. लोकरीच्या पॉनपॉन सेट मधील विविध साचे वापरून लहान मोठे लोकरीचे भरगच्च बॉल तयार करून घ्या. ते बांधताना लोकर मात्र लांबलचक घ्या. त्यावर फेव्हिकॉल मिसळलेले पाणी किंचित शिंपडून विविध रंगांची चमकी वरून हाताने पसरवून घ्या. विविध रंगात आकर्षक चमकणारी झुंबरे खूपच छान दिसतील व सर्वांचे लक्ष त्याकडे वेधल्याशिवाय राहाणार नाही.

आता पतंगाच्या कागदापासून आकर्षक फुले व पाने कशी करतात ते पाहू. प्रथम ज्या रंगाची फुले करावयाची आहेत त्या रंगाचा कागद घेऊन २'' उंचीची घडी घालून २'' ह्व २'' मापाचे चौकोनी तुकडे कापून घ्या. (आ. १ प्रमाणे) नंतर घड्या पाडून आकृती २ व ३ पाहा. पाकळीचे चित्र घडीवर काढून घेऊन कात्रीने कापा. आ. ४ पाहा. अशा रीतीने फुलाची १ पाकळी तयार होईल. नंतर पेन्सिलने पाकळीची टोके आत वळवून गोल करून घ्या. अशा १० ते १२ पाकळ्या कापून घ्या. आकृती ५ पाहा.

त्यानंतर आकृती ७ प्रमाणे पिवळा कागद कापून घड्या करून तारेत गुंडाळून पराग तयार करा व त्या तारेत एक एक पाकळी खालून तारेत ओवून घेऊन आकृती ७ ब प्रमाणे संपूर्ण फूल तयार होईल त्या फुलासाठी हिरवे पान आकृती ९ प्रमाणे हिरवा गर्द कागदाचा तुकडा कापून चार घड्या घालून पानाचे चित्र काढून कापा ही पानेही तारेतून खालून ओवून फुलाच्या तळास डिंकाने चिकटवून संपूर्ण रंगीत फूल तयार होईल. अशा प्रकारे खूप फुले विविध रंगात तयार करून गणपती उत्सवात छान सजावट करता येईल.

***

## काही अंधारलेले - काही रूपेरी क्षण

– सौ. अनघा लवळेकर

हिन्दुस्थानला मिळालेलं स्वातंत्र्य काही निष्कलंक नव्हतं. हिन्दुस्थानच्या हृदयावर एक मोठा अभिशाप गोंदवूनच ते आलं होतं. हा शाप विभाजनाचा! फाळणीचा! एकसंध-अखंड-विराट हिन्दुस्थानाचं स्वप्न जातीयता-धर्मांधतेच्या असुरांनी पुसून टाकलं होतं. शकलं झालेला भारत आपल्या हाती पडला. १९०६ पासून याच ध्येयाने पछाडलेल्या मुस्लिम लीग आणि बॅरिस्टर जीना यांनी 'पाकिस्तान' निर्मितीचा डाव साधला होता. त्यांनी घेतलेल्या आक्रमक पावित्र्यापुढे पंडित नेहरू, पटेल, यांसारखे पुढारीसुद्धा हतबल झाले. 'आधी माझ्या शरीराचे तुकडे करा आणि मगच देशाचे' असे ठासून बजावणारे महात्माजी सुद्धा जीनांच्या फुटीर आणि हटवादी मनोवृत्तीपुढे नमले. पंजाब आणि बंगाल ह्या समृद्ध प्रांतांच्या हृदयांत हा दुधारी सुरा खुपसला फाळणीनं. केवळ भूमीचेच नव्हेत तर अनेकांचे संसार-घरदारे आणि त्याहीपेक्षा परस्परांवरील विश्वास-प्रेम यावरच घाव घातले. हजारो लोकांच्या कत्तली झाल्या. गाड्या भरभरून जेव्हा प्रेते दिल्ली स्टेशनवर येऊ लागली तेव्हा संतापाने पेटून इथूनही तसेच उत्तर पाकिस्तानला दिलं गेलं.

फाळणीचा हा निखारा अजूनही विझलेला नाही, तीच फुटीर मनोवृत्ती आजही हिन्दुस्थानातील लोकांचं जीवन उद्ध्वस्त करण्यास टपलेली आहे. हे आज घडणाऱ्या अनेक घटनांवरून दिसून येते.

केवळ फाळणीवर पाकिस्ताननं समाधान मानलेलं नव्हतं. 'भारताचे नंदनवन' समजलं जाणाऱ्या काश्मीर संस्थानांवर त्यांनी लगेचच हल्ला चढविला. (१९४८) त्यांची वखवख शमलेली नव्हती. भारताला जरी हे अनपेक्षित असलं तरीही भारतीय सैन्यानं पराक्रमाची शर्थ केली. काश्मीरचे राजे हरिसिंह यांनी काश्मीरचे भारतात विलीनीकरण मान्य करताच भारतीय सेना वायुमार्गानं श्रीनगरला आली. अक्षरश: इंच इंच भूमी लढवीत आपल्या बहादूर सैनिकांनी पाक सैन्याला पुष्कळच मागे रेटले. यावेळी आपल्या प्राणांची बाजी लावून कॅ. सोमनाथ शर्मासारखे अनेक वीर हुतात्मा झाले. वस्तुत: ही लढाई निर्णायकच व्हायची पण जो प्रश्न सैन्याच्या बळावर सुटण्यासारखा होता, तो पं. नेहरूंनी युनोच्या सुरक्षा समितीत मांडला. युद्धबंदी घोषित झाली आणि हिन्दुस्थानचाच काही भाग 'आझाद काश्मीर' या नावानं पाकिस्तानच्या अप्रत्यक्ष अमलाखाली गेला. आजही हा काश्मीरचा धुमसणारा प्रश्न आपलं सरकार यशस्वीपणे सोडवू शकलेलं नाही. याचं अजून एक कारण म्हणजे घटनेच्या ३७० व्या कलमानुसार त्या राज्याला दिलेला विशेष दर्जा.

प्रारंभी तर काश्मीरची घटना, पंतप्रधान, ध्वज सर्वच वेगळं असावं अशी अट विलीनीकरणाच्या वेळी घातलेली होती. काश्मीरचे तथाकथित नेते शेख अब्दुल्ला हे

त्याचा फायदा घेऊन स्वतंत्र राष्ट्राची मागणी पुढे रेटीत होते. १९५२ साली, 'एक देश में दो विधान–दो प्रधान नहीं चलेंगे' ही घोषणा करत जनसंघाने आंदोलन केलं. श्री. शामाप्रसाद मुखर्जी यांच्या नेतृत्वाखाली आंदोलकांनी काश्मीरमध्ये प्रवेश करताच त्यांना अटक झाली. श्री. शामाप्रसादांचा तुरूंगातच संशयास्पद मृत्यू झाला. या चळवळीचा परिणाम म्हणून की काय, पण काश्मीरचा स्वतंत्र दर्जा कायम ठेऊनच सरकारने वेगळी घटना, पंतप्रधान व ध्वजाची तरतूद रद्द केली. परंतु या विशेष दर्जामुळे पेरली गेलेली फुटीरता आणि भारत द्वेषाची बीजे आज विक्राळ स्वरूप दाखवून भारताला पेचात टाकत आहेत. ज्या काश्मीरमध्ये 'तक्षशिला' सारखं गाजलेलं संस्कृत विद्यापीठ होऊन गेलं तिथे Indian Dogs - Go Back म्हणणारी J.K.L.F. सारखी दहशतवादी संघटना आपले पाय रोवून आहे.

स्वतंत्र भारताला बसलेला अजून एक तीव्र धक्का म्हणजे सर्व भारतीयांना पित्यासमान असणाऱ्या महात्मा गांधींची हत्या. (२ ऑक्टो. १९४८) या हत्येचे रक्तरंजित पडसाद साऱ्या देशभर उमटले. कोण्या एका माथेफिरूनं केलेल्या हत्येमागे मोठे कारस्थान असल्याची शंका घेऊन



सरकारने स्वातंत्र्यवीर सावरकरांसारख्या ज्वलंत देशभक्तालाही या खुनखटल्यात आरोपी म्हणून उभं केलं. कालांतराने त्यांची मुक्तताही करण्यात आली. ह्या हत्येची प्रतिक्रिया पार तीव्र उमटली. अगदी खेड्या–पाड्यातही जाळपोळ, दंगली उसळल्या. समाजाच्या एका मोठ्या वर्गाला मोठी प्राणहानी, वित्तहानी सोसावी लागली. महात्माजींचं अहिंसेचं तत्त्वज्ञान त्यांचेच अनुयायी म्हणविणाऱ्यांनी पायदळी तुडविलं.

स्वातंत्र्योत्तर काळातील एक महत्त्वाचं रूपेरी पान

म्हणजे भारताच्या एकसंघपणाकरिता सरदार पटेलांच्या पुढाकारानं झालेलं संस्थानांचं विलीनीकरण ! स्वतंत्र भारतात छोटीमोठी एकूण ७०० च्यावर संस्थानं होती. भारतात अंतर्गत दुफळी माजावी म्हणून ब्रिटिशांनी या संस्थानिकांना हेतुपूर्वकच स्वतंत्र ठेवलं होते. सरदार पटेलांनी या सर्वांना एकछत्री भारतात सामील होण्याचं आवाहन केलं. जवळजवळ सर्वांनीच त्याला अनुकूलता दाखवून विलीनीकरण मान्य केलं. तीन बड्या संस्थानांपैकी काश्मीर संस्थान पाकच्या चढाईमुळे स्वत:हून विलीन झालं पण तरीही अद्याप दोन हटवादी संस्थानिक होतेच. ते म्हणजे हैद्राबादचा निजाम आणि जुनागढचा नबाब. हैद्राबादच्या निजामानं तर 'रझाकार' ही वेगळीच दहशतवादी संघटना स्थापून भारतात सामील होऊ इच्छिणाऱ्या प्रजेवर अनन्वित अत्याचार केले अनेकांना यात प्राणाला मुकावे लागले. वारंवार ताकीद देऊन, वाटाघाटी करण्याची सूचना देऊनही निजाम ऐकेना तेव्हा मात्र गृहमंत्री सरदारांनी हैद्राबाद संस्थानांवर लष्करी कारवाई करण्याचा निर्णय घेतला. काही दिवसातच आपल्या सेनेनं निजामाला पळता भुई थोडी केली. हैद्राबाद भारतात विलीन झालं.

जुनागढ हे गुजराथच्या सीमावर्ती राज्यातील संस्थान. प्रजा हिंदू तर राजा मुसलमान. प्रजेची इच्छा हिंदुस्थानात राहाण्याची तर नबाबाला ओढ पाकिस्तानची. अखेर सार्वमत भारताच्या बाजूनं झुकताच सरदारांनी इथेही आपला बडगा दाखविला. स्वत: नबाब मात्र भरपूर संपत्ती आणि अनेक बायका घेऊन विमानानं कराचीला पळून गेला.

संस्थान विलीनीकरणानं भारताच्या मुकुटात एक तुरा खोवला. पण आज विचार करताना असं वाटतं की, खरोखर ह्या सर्व ठिकाणी आणि अन्यत्रही एकसंध बनण्याची प्रक्रिया खरंच यशस्वी झाली आहे का? अजूनही फुटीरतावादी चळवळी आपलं उग्ररूप का दाखवत आहेत? स्वतंत्र काश्मीर, बोडोलॅण्डचं वेगळं राज्य, झारखण्डचं वेगळं राज्य ह्या मागण्या का? मुंबईसारख्या आर्थिक राजधानी असलेल्या शहरांत भीषण बॉम्बस्फोट का? कोणाच्याही अध्यातमध्यात नसलेल्या सामान्य नागरिकांवर ही भीतीची टांगती तलवार का?

या साऱ्याचं मूळ आपल्याला गेल्या पंचेचाळीस वर्षांच्या वाटचालीत कुठे सापडेल का? यांची उत्तरं आपल्या पिढीलाच शोधायची आहेत. म्हणूनच पुढच्या वेळी स्वातंत्र्याच्या पहिल्या दशकांतील अन्य महत्त्वाच्या घडामोडींचा परामर्श घेऊ या. मुख्यत: पहिली पंचवार्षिक योजना, 'भूदाना'ची अत्यंत गाजावाजा झालेली चळवळ, डॉ. आंबेडकरांचा बौद्धधर्म प्रवेश, सोमनाथ मंदिराचा जीर्णोद्धार या घटनाची माहिती घेऊ या.

**अवश्य वाचावीत अशी पुस्तके :**

१) फाळणीची शोकान्तिका –
ले. हो. वि. शेषाद्री (अनु. सुधीर जोगळेकर)

२) काश्मीर काल–आज–उद्या –
ले. कर्नल शाम चव्हाण

३) स्वातंत्र्योत्तर माझा भारत –
ले. पंढरीनाथ रेगे

४) हैद्राबाद मुक्तिसंग्रामाच्या कथा

# प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास

**– डॉ. अशोक निरफराके**

कवी, कथालेखक, कादंबरीकार, नाटककार, चित्रकार, शिल्पकार, संगीतकार, शास्त्रज्ञ... या सगळ्यामध्ये समान असलेला गुण कोणता? विचार करून पहा. तुमच्या लक्षात येईल की या सगळ्यांना सतत नवीन नवीन कल्पना सुचत असतात आणि आपल्याला सुचलेल्या कल्पना हे लोक, शब्द, रंग, रेषा, माती, दगड, सूर, ताल, आकडे, चिन्हे, यंत्रे, उपकरणे, वगैरे मधून व्यक्त करीत असतात. हे करण्याची बौद्धिक शक्ती म्हणजेच कल्पनाशक्ती किंवा प्रतिभा. आपल्यापैकी प्रत्येकामध्येच ही शक्ती थोड्याफार प्रमाणात, झोपलेली किंवा जागी अशी असतेच. तिला चांगली जागी करून कामाला लावण्यासाठी आपण काही गंमतदार खेळ किंवा कृतिपाठ करून बघणार आहोत.

**'शब्द सुचतात का शब्द?'**

आपली कल्पनाशक्ती कवी किंवा लेखक यांच्यासारखी व्हायला हवी असेल, तर आपल्याकडे 'शब्दप्रभुत्व' हवे, म्हणजे शब्दावर आपली हुकूमत चालली पाहिजे. हव्या त्या वेळी हव्या त्या प्रकारचा म्हणजे हव्या त्या अर्थाचा, हव्या त्या लांबीरूंदीचा आणि हव्या त्या नादाचा (आवाजाचा) शब्द आपल्याला सुचला पाहिजे. खूप वाचन केले आणि त्यामुळे खूप शब्दांचे अर्थ माहीत झाले एवढे त्यासाठी पुरेसे नाही. तर आपण शब्द स्वतंत्रपणे वापरीत राहिले पाहिजे. असे शब्द वापरण्यासाठी आणि वाकवण्यासाठी हे काही खेळ खेळून पहा.

अनुप्रास असलेले लांबलचक वाक्य लिहिणे. उदा– 'पप्पूला पांडूने पळवून पंढरपूरला पोहचविल्याचे पाहून पंतांची पगडी पर्वतीच्या पायथ्याशी पडली !' या वाक्यातला प्रत्येक शब्द 'प' च्या बाराखडीतल्याच अक्षराने सुरू झालेला आहे. अशा रीतीने ठराविक अक्षर पुन्हा पुन्हा वाक्यात येणे म्हणजे अनुप्रास. अशी काही अनुप्रास असलेली वाक्ये तुम्ही लिहून पाठवा.


लगेच सुचत नसले तर काय कराल? प्रथम 'प' ने सुरू होणारी काही माणसांची नावे, आडनावे, ठिकाणांची नावे, वस्तूंची नावे, वेळा, विशेषणे, क्रियापदे इत्यादींच्या याद्या तयार करा. या याद्या समोर ठेवल्या की त्या शब्दांच्या जुळणीतून मोठमोठी वाक्ये तयार होऊ लागतील. 'प'ची वाक्ये जमल्यानंतर तुम्हाला हव्या त्या अक्षराची बाराखडी घ्या आणि त्या अक्षरांचा असा 'अनुप्रास' साधणारी वाक्ये तयार करून आमच्याकडे पाठवा.

***



# विज्ञानाच्या चष्म्यातून

**कॅबिनेट ड्रायर तयार करा.** **–राहुल देवांग, राजेंद्र जाधव**
९ वी, माध्यमिक विद्यालय, धुळे



**उद्देश –** शेतीचे पदार्थ तंबाखू, मिरची, भाजी, द्राक्षे, इ. शेतातून निघाल्यानंतर त्यातील दमटपणा काढून टाकण्याची गरज असते. त्यामुळे माल साठवून ठेवला असता तो खराब होत नाही. द्राक्षे वगैरे काही फळेही वाळवून टिकविता येतात. ही क्रिया उन्हात ठेवून केली असता फळांच्या रुचीत व रंगात फरक पडतो. तसेच जमिनीवर उघड्यावर वाळवल्यामुळे ती प्रदूषित होतात. हे पदार्थ प्रदूषित न होता ह्या यंत्राद्वारे योग्य रीतीने वाळवले जातात.

**साहित्य –** पुठ्ठे, काच, वॉलपेपर, तारेची जाळी, काळा रंग व फेव्हिकॉल.

**रचना –** यामध्ये ड्रायरच्या सपाट भागावर काळ्या रंगाचा शोषक थर असतो. त्यावर काचेचे आवरण असते. पुढील बाजूस हवा आत येण्यासाठी अरुंद मार्ग असतात. वरच्या बाजूला जो पदार्थ वाळवावयाचा असतो तो ठेवण्यासाठी पेटी असते. त्यावर एक धुराडे (चिमणी) बसविलेली असते.

**कार्य –** काचेतून सूर्यकिरण आतील काळ्या भागावर पडतात. काळ्या पृष्ठभागावर प्रकाश किरण पडले असता तो भाग तापतो. काळा पृष्ठभाग हा उष्णता–ऊर्जा साठवून ठेवतो. ह्या साठवलेल्या ऊर्जेमुळे कॅबिनेटमधील हवा गरम होते. त्याचवेळी पुढल्या अरुंद मार्गातून येणारी थंड हवा आत येऊन तापते व जो पदार्थ वाळवायचा असतो त्यावरून ती गरम हवा पदार्थावर खेळविली जाते व त्यावरून ती गरम हवा धुराड्याकडे (चिमणीकडे) जाते. तेथील पदार्थांचा पाण्याचा अंश वाफेच्या रूपाने निघून जातो व पदार्थ वाळतो. या रचनेला कॅबिनेट ड्रायर असे म्हणतात.

**महत्त्व –** शेतीचे पदार्थ प्रदूषित न होता चांगल्या प्रकारे वाळविले जातात. त्यासाठी कॅबिनेट ड्रायर हे कमी खर्चाचे व उपयोगी असे यंत्र आहे.

* *

विज्ञान प्रयोग : उत्तर : अनेकांनी प्रयोग करून पाहिले असेल. कागद फिरू लागतो हे तुम्ही पाहिले असेल. असे का? हाताच्या उष्णतेमुळे हाताजवळची हवा गरम होऊन वर जाते. ती गरम हवा कागदाला ढकलून वरती येते. त्यामुळे कागद फिरू लागतो. ताप असलेल्या व्यक्तीचा हात अधिक गरम असल्याने हवा लवकर गरम होऊन लवकर वर जाईल व कागद वेगाने फिरू लागेल.

# आकाश का निळे...निळे?

– **श्री. मा. गो. काटकर,** सोलापूर

आईने नंदाला निळा झगा शिवला होता. नंदा मोठ्या आनंदाने गाणे गात होती. 'छान माझ्या झग्याचा निळा निळा रंग. गोपाळकृष्णाचा आहे तसा रंग. आकाशाचा सुद्धा आहे निळा रंग.' नंदा गाण्यात झाली होती दंग.

तेवढ्यात शीळ घालीत वारेदादा आला. नंदाला म्हणाला, 'आकाशी रंगाचा झगा तुझा छान. गोड तुझं गान' नंदा हसली. वाऱ्याला म्हणाली, 'वारेदादा, आकाशाला कुणी दिला निळा रंग?' 'मी', वारेदादा म्हणाला. 'कोण तू?' नंदा आश्चर्याने म्हणाली, 'काही तरी बोलू नकोस' 'खरं सांगतो, नंदा', वारेदादा म्हणाला, 'माझ्यामुळं आकाश निळं निळं दिसतं.'

'कसं ते सांग बघू!' वारेदादा म्हणाला, 'पृथ्वीभोवती माझं पांघरूण म्हणजे वातावरण आहे. ते माझ्या कणाकणांनी बनलेलं आहे. त्यात पाण्याची वाफ, धूर आणि धुळीचे कण तेही मिसळलेले असतात. त्या कणांवर सूर्यप्रकाश पडला की, ते कण तो प्रकाश चहुकडे पसरून देतात आणि मग काय होते, तर आकाश निळे दिसते.'

सूर्यप्रकाश पांढरा आणि आकाश निळे.' 'हे रे कसे वारेदादा?' नंदाने विचारले. 'नंदा, बरोबर आहे तुझा प्रश्न', वारेदादा म्हणाला, 'तू इंद्रधनुष्य पाहिलं आहेस ना?' 'हो किती सुंदर दिसते ते! त्याचे मोहक रंग मला फार आवडतात. जांभळा, किरमिजी, तांबडा, निळा, नारिंगी, हिरवा आणि पिवळा'. 'वा, तुला इंद्रधनुष्याचे सगळेच रंग पाठ आहेत की!' वारेदादा म्हणाला, 'तेच रंग सूर्यप्रकाशात असतात. त्या सगळ्या रंगांच्या मिश्रणाने पांढरा प्रकाश बनतो.'

'प्रकाशाची आणखी एक गंमत आहे बरं का, नंदा! तळ्याच्या पाण्यात खडा टाकला म्हणजे काय होतं?' 'पाण्यावर गोल गोल छोटे तरंग उठतात आणि ते मोठे मोठे होऊन पसरत जातात,' नंदा म्हणाली.

'तसेच प्रकाशाचे तरंगही चहूकडे पसरत जातात.' वारेदादा म्हणाला, 'आणखी एक गंमत अशी की, प्रकाशातील निरनिराळ्या रंगांचे तरंग निरनिराळ्या लांबीचे असतात. निळ्या रंगाचे तरंग छोटे असतात म्हणून ते माझ्या कणांच्या संगती असलेल्या वाफ आणि धुळीच्या कणांनी सहजपणे चहूकडे पसरले जातात आणि आकाश निळे निळे दिसते. जेथे धूर अथवा धूळ जास्त प्रमाणात असते तेथे आकाश फिकट निळे दिसते. आणि जेथे धूर नसतो तेथे आकाश गडद निळे असते.'

'वारेदादा, मोठा गमत्या आहेस तू!' नंदा म्हणाली, 'पण सूर्योदयाच्यावेळी आणि सूर्यास्ताच्या वेळी आकाश तांबडे, नारिंगी, गुलाबी, असे रंगीबेरंगी फार सुंदर दिसते, त्याचे कारण काय?'

'त्याचे कारण असं, 'वारेदादा म्हणाला, 'सूर्य उगवण्याच्या वेळी व तो मावळण्याच्या

वेळी त्याचा प्रकाश पृथ्वीच्या पृष्ठभागाजवळ असलेल्या वातावरणाच्या दाट थरात प्रवेश करतो. तेथे धुळीच्या कणांची खूप गर्दी असते. त्यामुळे प्रकाशातील जास्त लांबीचे तांबडे आणि नारिंगी तरंग चहूकडे पसरले जातात आणि आकाश तांबडे, नारिंगी, गुलाबी असे मजेदार दिसते. बरं का नंदा, आकाशात दिसणाऱ्या कोणत्याही रंगाचं कारण म्हणजे प्रकाश आणि वातावरण'

'वातावरण म्हणजे तुझं पांघरूण' नंदा म्हणाली,

'हो, ते जर पृथ्वीभोवती नसतं तर आकाश कसं दिसलं असतं, सांगू?'

'सांग की, वारेदादा', 'अगदी काळंकुट्ट.'

'सगळंच आकाश?' नंदाने आश्चर्याने विचारले.

'हो सगळंच आकाश अगदी काळंकुट्ट दिसलं असतं. बरं का नंदा खूप उशीर झाला, आता मी जातो उद्या पुन्हा येतो.'

l

---

(पान क्र. १३ वरून पुढे चालू)

## सामाजिक प्रज्ञेचे स्वरूप

वर्तनाचा फक्त एकच अर्थ असतो असे नाही. तसेच मानवी प्रश्न सोडवण्याची फक्त एकच पद्धत असते असे नाही.

'ज्यांना मानवी वर्तनाचे विविध अर्थ समजतात व ज्यांना मानवी प्रश्न कसे सोडवावेत, याची वेगवेगळी उत्तरे सुचतात. त्यांच्याकडे ही क्षमता जास्त असते.

कधी कधी मात्र मानवी प्रश्न सोडवत असताना एका विशिष्ट दिशेनेच विचार करावा लागतो. उदा. गुन्ह्याचा तपास करत असताना दोषी कोण हे ठरवले जाते.

अशा वेळी अनेकांनी जरी हा प्रश्न सोडवायला घेतला, तरी त्या सर्वांचे बरोबर उत्तर एकच येणे अपेक्षित असते. अशा एकमेव बरोबर उत्तराकडे येताना आपल्याला जी क्षमता वापरावी लागते, ती चवथ्या प्रकारची क्षमता होय.

बरेचदा आपल्याला एखादी व्यक्ती योग्य वागली की, अयोग्य, ती पूर्वीसारखी वागली, की वेगळी, आणि तिचे वागणे इतरांसारखेच आहे की त्यांच्यापेक्षा निराळे आहे, असे ठरवावे लागते, अशा निर्णयाप्रत येताना आपल्याला जी क्षमता वापरावी लागते, ती पाचव्या प्रकाराची, वर्तनाचे मूल्यमाप करण्याची क्षमता होय.

या पुढील अंकात ही प्रज्ञा वाढवता येते का, असल्यास किती व कशी यासंबंधी माहिती करून घेऊ.


l l l

### असे का?

**तोंडासमोर हात धरा. आता तोंडाने हातावर फुंकर मारा. कसे वाटते? गार की गरम. आता तोंड पूर्ण उघडा अन् हातावर आतील हवा बाहेर फेका. आता कसे वाटते? गार की गरम? असे का?**

# ओळख महाराष्ट्राची (भाग १) भौगोलिक महाराष्ट्र

**– सुरेंद्र ठाकूरदेसाई**



सध्याच्या महाराष्ट्र राज्याची निर्मिती १९६० साली भाषिक आधारावर मुख्यत: मराठी भाषिक राज्य म्हणून झाली.

सध्याचे महाराष्ट्र राज्य हे देशातील तिसऱ्या क्रमांकाचे मोठे राज्य आहे. महाराष्ट्राचे क्षेत्रफळ ३,०७,६०९ वर्ग कि.मी. आहे. महाराष्ट्र राज्य हे ३० जिल्हे व ३०२ तालुक्यांचे बनलेले आहे.

महाराष्ट्र राज्याला अरबी समुद्राचा किनारा व सह्याद्री पर्वत यासारखी सुंदर लेणी लाभलेली आहेत. महाराष्ट्राचे हवामान, प्राकृतिक रचना या सर्वांवर या दोन गोष्टींचा प्रभाव आहे. या पर्वतामुळे महाराष्ट्राचे ३ विभाग होतात. समुद्रकिनारा व जवळपास समांतर असलेला सह्याद्री यामध्ये जी चिंचोळी पट्टी आहे तिला 'कोकण' म्हणतात. सह्याद्रीच्या विविधरांगा व शाखा महाराष्ट्राच्या पश्चिमभाग व्यापतात. सह्याद्रीच्या पूर्वेला दख्खनचे पठार आहे.

सह्याद्री पर्वत हा लाव्हारसांच्या थरांपासून बनलेला आहे. हे थर एकावर एक असे आडवे पसरलेले आहेत. सह्याद्री पर्वताचा

पश्चिमेकडचा उतार तीव्र आहे. ह्याला 'कोकण कडा' असे म्हणतात. सह्याद्रीचे पूर्वेकडचे उतार त्या तुलनेत मंद आहेत. अनेक नद्यांनी ह्या डोंगर रांगात स्वत:ची खोरी निर्माण केली आहेत. सह्याद्रीची सरासरी उंची समुद्रसपाटीपासून ९०० मी. आहे. परंतु, सह्याद्रीच्या सर्वोच्च शिखरांची उंची यापेक्षा खूप जास्त आहे. 'कळसूबाई' हे सर्वात उंच शिखर आहे. त्याची उंची (१६४६ मी.) आहे. याशिवायची उंच शिखरे याप्रमाणे हरिश्चंद्रगड (१४२४ मी.), रत्नागिरी (११२६ मी.), फोंडाघाट (९०१ मी.) सह्याद्रीची उंची उत्तरेकडून-दक्षिणेकडे कमी होत जाते.

सह्याद्रीमध्ये लोणावळा, महाबळेश्वर, अंबोली ही थंड हवेची ठिकाणे प्रसिद्ध आहेत. सह्याद्री पर्वताच्या माथ्यावर खूप पाऊस पडतो. (सुमारे ३००० ते ४००० मि.मी.) हा पाऊस दोन भागात विभागला जातो. काही पाणी पश्चिमेकडील कड्यावरून कोकणात झेपावते व उरलेले पूर्वेकडच्या नद्यांकडे जाते. सह्याद्री पर्वत हा फक्त कोकणातीलच नव्हे तर एकूणच भारताच्या दक्षिण पठारावरच्या अनेक नद्यांचे उगमस्थान आहे. द. भारतातील दोन सर्वात मोठ्या नद्या गोदावरी व कृष्णा सह्याद्री पर्वतात उगम पावतात. गोदावरी त्र्यंबकेश्वरला तर कृष्णा महाबळेश्वरला. कृष्णेची मुख्य उपनदी भीमा सुद्धा सह्याद्रीमध्ये भीमाशंकर येथे उगम पावते. सह्याद्रीमध्ये उगम पावणाऱ्या इतर नद्या आहेत. गिरणा, प्रवरा, मुळा, मुठा, कोयना, पंचगंगा, हिरण्यकेशी इ. आता जंगलतोडीमुळे बहुतांश जंगले नष्ट झाली आहेत. काही भागात मात्र ही जंगले/अभयारण्ये संरक्षित म्हणून घोषित केल्याने टिकून आहेत. अशी घनदाट-जंगले जव्हार, भीमाशंकर कोयना धरणाच्या आसपास पाहायला मिळतात.

कोकणपट्टी जवळजवळ ५०० कि.मी. लांब आहे. तिच्या पश्चिमेला अरबी समुद्र व पूर्वेला सह्याद्रीचा कणा आहे. ह्या पट्टीची रूंदी मात्र समान नसून ती उत्तरेकडून दक्षिणेकडे कमी होत जाते. ठाणे जिल्ह्यातील भूप्रदेश हा सपाट आहे. ह्या भागातून उल्हास व भातसा ह्या दोन मुख्य नद्या वाहतात. उल्हास नदी खंडाळ्याजवळ उगम पावते तर, भातसा नदी थळघाटाजवळ. दोन्ही नद्यांमध्ये सह्याद्रीच्या माथ्यावरूनही पाणी येते. उल्हास नदीकाठी सपाट जागेमुळे मोठी शहरे वाढली आहेत. मुंबई सुद्धा उल्हास नदीच्या मुखापाशीच वसले आहे. दक्षिणेकडे म्हणजे रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात कोकण डोंगरदऱ्यांचे बनले आहे. या भागातून अनेक नद्या वाहतात. यातील मुख्य नद्या म्हणजे अंबा, कुंडलिका, सावित्री, वसिष्ठा इत्यादी. या सर्व नद्या सह्याद्री पर्वतात उगम पावून पश्चिमेला वाहतात. पावसाळ्यात या नद्यांना मोठे पूर येतात. परंतु उन्हाळ्यात या नद्या बहुतांशी कोरड्या असतात. या नद्या जेथे अरबी समुद्राला मिळतात तिथे खाड्या तयार झाल्या आहेत. या खाड्यांमधून अनेक ठिकाणी समुद्राचे पाणी २५ कि.मी. पर्यंत आत येते. या खाड्यांचा उपयोग वाहतुकीसाठी व मासेमारीसाठी केला जातो.

समुद्रकिनाऱ्यावर अनेक छोटी-मोठी बंदरे आहेत. मुंबई हे मोठे बंदर आहे. तर रेवस, अलिबाग, श्रीवर्धन, हर्णे, जयगड, रत्नागिरी व ऊरण, जैतापूर, मालवण ही छोटी बंदरे आहेत. अनेक प्राचीन बंदरांचे अवशेष अजूनही पाहायला मिळतात. उदा. सोपारा, चौलक, विजयदुर्ग, समुद्रकिनारी अनेक कडे निर्माण झाले असून असे प्रेक्षणीय कडे हरिहरेश्वर सारख्या ठिकाणी पाहता येतात.

सह्याद्री पर्वताच्या पूर्वेला ७०० कि.मी. पर्यंतचा दख्खनच्या पठाराचा भाग महाराष्ट्रात येतो. या पठाराचा उतार पूर्वेकडे आहे. अजिंठा डोंगराच्या उत्तरेला मात्र उतार उत्तर पश्चिमेकडे आहे. सह्याद्रीच्या काही डोंगररांगा पठारावर पसरल्या आहेत. यामध्ये मुख्य अजिंठा रांग, बालाघाट रांग व महादेव रांग आहेत. पठारावर पाऊस कमी पडतो. हा पाऊस पूर्वेकडे कमी होतो. मराठवाडा व शेजारील जिल्हे निम वाळवंटी हवामान दाखवतात. अती पूर्वेकडे म्हणजे नागपूर, भंडारा व चंद्रपूर जिल्ह्यात पावसाचे प्रमाण पुन्हा वाढते. हा सर्व भाग तीन नद्यांची खोरी म्हणून ओळखला जातो. या तीन नद्या म्हणजे तापी, गोदावरी व कृष्णा, यामधील तापी. ही वैशिष्ट्यपूर्ण नदी आहे. ही महाराष्ट्राच्या पठारावरील एकमेव पश्चिम-वाहिनी नदी आहे. ही नदी सातपुडा पर्वत व अजिंठ्याची रांग यामधून वाहते. हिचा उगम सातपुडा पर्वतात होतो. तापी नदीची लांबी ७२४ कि.मी. आहे.

तापी, गोदावरी आणि कृष्णा या तीन मोठ्या नद्या व त्यांच्या उपनद्या दख्खनच्या पठारावरून वाहतात. या नद्यांच्या पाण्याचा उपयोग मोठ्या प्रमाणावर शेतीसाठी व पिण्यासाठी होतो.

असा हा भौगोलिक वैविध्य असलेला महाराष्ट्र! या महाराष्ट्राच्या इतर विविध अंगांची ओळख आपण पुढील लेखांमध्ये करून घेऊ.

आपल्या जिल्ह्यातील सर्वात उंच ठिकाण शोधून काढा व जमल्यास भेट द्या.

आपल्या गावाजवळून वाहणारी नदी, ती ज्या नदीला मिळते ती नदी असा क्रम शोधा. शेवटी हे पाणी कुठल्या प्रमुख नदीला जाऊन मिळते. (कृष्णेला, गोदावरीला की इतर कुठल्या नदीला?) आपल्या जिल्ह्यातील महत्त्वाची धरणे कोणती ते शोधा.

***

## Riddle me Riddle

1) What grows bigger the
more you take from it?

2) A box without hinges
a key or lid,
yet golden treasure
inside is hid

3) What has teeth
but cannot bite?

4) There may be a houseful or
a hopeful
But you cannot catch
a bowful

Answers : 1) Fire 2) An Egg 3) Comb 4) Smoke

# 'तेव्हाचे शिक्षण : आत्ताचे यश'

– अविनाश धर्माधिकारी,
I.A.S. पुणे

## हे असं कसं काय?

महेंद्राने कल्पना सुचविली, 'आपल्या प्रबोधनसाठी काहीतरी लिही म्हणून. 'पुण्यात अतिरिक्त जिल्हाधिकारी म्हणून काम करताना वेळ मिळाला तर किंवा कधी मुद्दाम वेळ काढून मी प्रबोधिनीत जातो. अशा एकावेळी महेंद्राने ही कल्पना सुचवली. मी आनंदाने हो म्हणालो. कारण आज तथाकथित मोऽऽऽठ्ठा सरकारी अधिकारी असलो तरी मूळ मी शिक्षक – खेळाडू – कार्यकर्ता. अजून तरी शाळेतल्या मुलामुलींमध्ये मिसळायला, खेळायला, गप्पा मारायला मजा येते. सरकारी फायली, खाकी कागद, गंभीर चेहरे, पिवळ्या डिस्टेंपरने रंगवलेल्या भिंती अशा खास सरकारी नेपथ्य रंगभूषा – वेशभूषा – यातून बाजूला येऊन पुन्हा शिक्षक – खेळाडू बनायला मजा येते. आणि कार्यकर्ता तर मी नेहमीच असतो. म्हणून म्हटले, प्रत्येक महिन्याला 'प्रबोधन' मधून तुम्हाला सर्वांना भेटायला यावं. तुमच्याशी गप्पा माराव्यात. पण आपण काय बोलणार? काय गप्पा माराव्या? आम्ही पूर्वी दलावर जमलो की खेळ संपल्यावर जशा गप्पा मारायचो किंवा डोंगरदऱ्यावर भटकायला गेलो. सिंहगड, राजगड, राजगडच्या बुरुजावर बसलो की जशा गप्पा मारायचो, तसं बोलावं म्हटलं तुमच्याशी–सर्वांशी.

एक कल्पना अशी सुचली की तुम्हाला मी, माझे अनेक सहकारी मित्र, प्रबोधिनीत रोजच्या रोज शिकत–काम करत असतानाच्या काळातल्या काही आठवणी सांगाव्यात. असा एक प्रचंड खजिना आहे माझ्यापाशी. कारण, १९६२ सालच्या ऑगस्ट महिन्यात ज्ञान प्रबोधिनीची स्थापना झाली तेव्हा मी 'फक्त' तीन वर्षांचा होतो. एका छोट्याशा दगडी वाड्यातल्या एका छोट्या खोलीत ७–८ मोठ्या लोकांनी बसून मोठे विचार केले. देशाच्या प्रश्नांविषयी विचार करून अर्थातच प्रबोधिनीचे संस्थापक, आमचे मित्र–गुरू–तत्त्वज्ञ आप्पा (डॉ. वि. वि. पेंडसे) होतेच. सात वर्षांनी म्हणजे १९६९ साली ज्ञान प्रबोधिनी प्रशालेची स्थापना झाली आणि मी या पहिल्याच वर्षापासून या प्रशालेत दाखल झालो. तेव्हा वय होतं दहा–इयत्ता सहावी. आपल्याला त्यावेळी स्वतःची इमारत नव्हती. दुसऱ्या शाळेच्या इमारतीत सकाळी सात ते नऊ आणि संध्याकाळी सात ते साडे–आठ अशी आमची त्यावेळी शाळा चालायची. संध्याकाळी शाळा भरायच्या आधी मैदानावर खेळ असायचे. कित्येकदा तसेच चिखलाने माखलेल्या चड्ड्या, बटन तुटलेले–फाटलेले शर्ट अंगावर घालून आम्ही संध्याकाळच्या तासांना बसायचो. बालकवी–कुसुमाग्रजांच्या कवितांपासून डाल्टन–आईनस्टाईनच्या विज्ञानापर्यंत सर्वकाही शिकायचा प्रयत्न करायचो. तुमचा सर्वांचा तर तेव्हा जन्मसुद्धा

झालेला नसेल. तेव्हापासून ते १९८६ मध्ये मी एक मोठी परीक्षा पास हो ऊन अधिकारी झाला (AS झालो)तेव्हापर्यंत म्हणजे एकूण तब्बल १७ वर्षे मी प्रबोधिनीत होतो. त्यातही १९७५ साली उच्च माध्यमिक परीक्षा पास झालो. तेव्हापासून १९८६ पर्यंत अकरा वर्ष प्रबोधिनीचा पूर्णवेळ कार्यकर्ता होतो. या वर्षांमध्ये आम्ही प्रबोधिनीचा विस्तार एका छोट्याशा दगडी खोलीपासून ते विशाल, सुंदर अशा सहा मजली मंदिरापर्यंत झालेला पहिला, त्याहूनही मोठा असा आप्पांच्या स्वप्नांचा विस्तार पाहिला. त्यात उद्योग व्यवसाय होते, खेडेगावांच्या विकासासाठी करण्याचं काम होतं, देशाच्या प्रश्नांवर संशोधन करण्याचं काम होतं, शिक्षण तर होतंच होतं.

अशी सतरा वर्षांची मोठी संपत्ती गाठीशी बांधून मी सरकारी अधिकारी झालो. आता जेव्हा मोठी-मोठी कामं करायची असतात, कोटी-कोटी रुपयांच्या योजना यशस्वी करायच्या असतात, हजारो कर्मचारी, नागरिकांना बरोबर घेऊन विकासाची चार पावलं चालायची असतात आणि देशाचे प्रश्न सोडविण्यासाठी आपल्या पदावरून आपल्या परीने चांगलं काम करायचं असतं तेव्हा ज्ञान प्रबोधिनीतल्या या सतरा वर्षांचीच संपत्ती कामी येत असते. मनात तर प्रबोधिनी कायमच असते. रोजच्या व्यवसायातसुद्धा त्यावेळचे अनुभव, शिक्षण दिशा दाखवण्याचं काम करतात.

परवाचीच गोष्ट घ्या. कोट्यावधी रुपयांची गुंतवणूक करून, हजारो माणसांसाठी नोकऱ्या निर्माण करणाऱ्या एका उद्योगाची अनेक कामं आमच्या काही कचेऱ्यांमध्ये पडून राहिली होती. त्या पायी या उद्योगाचे पैसे वाया जात होते आणि हजारो माणसांचा रोजगार बुडत होता. शिवाय त्या कारखान्याच्या परिसराचा विकास मागे पडत होता. त्या उद्योगाचे एक मुख्य व्यवस्थापक माझ्याकडे आले. त्यांनी अडचणी सांगितल्या. मी त्या समजावून घेतल्या आणि पुढे दोन दिवसात त्यापैकी महत्त्वाच्या अडचणी लगेच सोडवल्या. त्यात विशेष काहीच नव्हतं. कारण असं काम करण्यासाठीच तर आपली सरकारी नियुक्ती असते पण त्या मुख्य व्यवस्थापकाला मात्र हे विशेष वाटलं. ते म्हणाले, ''अतिरिक्त जिल्हाधिकारी म्हणजे मला वाटलं होतं एक फक्त मध्यमवर्गीय जाड-भिंगाचा चष्मा घालणारे, पोट सुटलेले गृहस्थ असतील, ते मला रुक्ष करड्या आवाजात कटवतील, एक आठवड्याने 'या' असं म्हणतील. तर इथे उलटंच घडलं. ''असं कसं काय?'' आता त्यांना कसं सांगणार की असं कसं काय म्हणून. मनात म्हटलं एका वाक्यात उत्तर द्यावे. मी त्या उद्योगपतीला विचारले, ''ज्ञान प्रबोधिनी नावाची संस्था तुम्हाला माहीत आहे का?'' ते हो म्हणाले तर मी म्हणालो, ''त्या ज्ञान प्रबोधिनीचा मी सतरा वर्षे विद्यार्थी, त्यातली अकरा वर्षे पूर्ण काळ कार्यकर्ता होतो, म्हणून हे असं'' त्यांना एकदम पटलंच हे.

तसं आपल्याशी, सर्वांना भेटावं म्हणून आपण दर महिन्याला या दोन पानावर भेटणार आहोत.

***

## व्यक्तिविकासासाठी विद्याव्रत !

ज्यांना खूप गतीने मोठी प्रगती करायची आहे अशा कुमार-कुमारींसाठी एक उत्तम पुस्तक छापून तयार आहे. या पुस्तकात आपले शरीर कसे कमवायचे, मन मजबूत कसे करावे, बुद्धी कुशाग्र कशी होते येथपासून ते आत्मिक विकसन म्हणजे काय येथपर्यंत अगदी सर्वांगीण विकासाचा मार्ग सांगितला आहे.

असे हे खास किशोर-किशोरींसाठी लिहिलेले पुस्तक आपली दिव्य-भव्य स्वप्ने साकार कशी करता येतात याचे मार्गदर्शन करण्यासाठी ३०-३५. युवक युवतींनी मिळून लिहिले आहे. प्रगतीच्या पथावर पुढे जाऊन मार्गक्रमण करणाऱ्यांनी आपल्या भावाबहिणींसाठी केलेले हे दिशादर्शन खासच खूप मोलाचे आहे.

मनात महत्त्वाकांक्षा ठेवून, सर्व क्षुद्र विचारांवर मात करून, ज्ञात अज्ञात अशा आपल्या साऱ्या शक्तींचा स्वहितार्थ व लोककल्याणार्थ उपयोग करायचा असेल तर वाचलेच पाहिजे असे पुस्तक आता तयार आहे.

**व्यक्तिविकासासाठी विद्याव्रत !**

ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन

पृष्ठसंख्या ११२

किंमत रु. २५/-, टपालाने रु. ३५/-


छात्र प्रबोधन

हे मासिक **'ज्ञान प्रबोधिनी'** या संस्थेच्या मालकीचे असून सौर भाद्रपद १ शके १९१५ (२३ ऑगस्ट, १९९३) या दिवशी प्रभात प्रिंटिंग प्रेस, गुलटेकडी येथे छापून ज्ञान प्रबोधिनी, पुणे येथून प्रसिद्ध केले.

**संपादक, प्रकाशक**
श्री. महेन्द्र सेठिया

**संपादक मंडळ**
महेंद्र सेठिया, B.E., M.Ed.
विवेक पोंक्षे, M.Sc., B.Ed.
अनघा लवळेकर, M.A., B.Ed.
शैलजा देशमुख M.A., M.Ed.

**रेखाचित्रकार**
श्री. दीपक संकपाळ

**संपर्क**
**'छात्र प्रबोधन'**
ज्ञान प्रबोधिनी,
५१० सदाशिव पेठ,
पुणे 411 030.
☎ ४३२६९१

**मुद्रक**
प्रबोध संपदा,
पुणे 411 002.

**नोंदणी क्रमांक**
PHM/153/VIII

रजि नं. : छात्र प्रबोधन PNCW/349 तिकिटाशिवाय पाठविण्याचा परवाना क्र. १२८

# क्षितिज नवे रे क्षितिज नवे !

कवी – प्रा. रामभाऊ डिंबळे

*क्षितिज नवे मज सतत बोलवी, साथीला सन्मित्र हवे*
*आज एकटा, अनघड जरि मी, मनात अंकुर हा उगवे*
*क्षितिज नवे, रे क्षितिज नवे !*
*निद्रेमधुनी जागा होता नवाच मी मजला दिसतो*
*उलगडणारी दुनिया भवती मी मध्ये माझा नसतो*
*साखर झोपेमधली हसरी स्वप्नमालिका अवतरते*
*कठोर अवघड सारे सरुनी आसमंत होती हिरवे*
*क्षितिज नवे रे क्षितिज नवे !*
*चुटकीसरशी सुटती गणिते गूढ समस्या आकळती*
*शतकांमधल्या उग्र लढाया जिंकुनिया मी छत्रपती*
*ग्रहगोलांची भ्रमणे अगतिक आणिक नियती सर्व कळे*
*अज्ञानाचा तिमिर सरे अन् ज्ञानाचा सविता उगवे*
*क्षितिज नवे रे क्षितिज नवे !*
*हिरमुसलेले नुरले कोणी आणि पांगले जे रडवे*
*मलाच माझे रूप उमजता मित्र मिळाले सर्व नवे*
*मी न एकटा माझ्या सोबत विहंगमाचे भव्य थवे*
*सर्वांसाठी एकच गाणे प्रबोधनाचे हे उजवे*
*क्षितिज नवे रे क्षितिज नवे !*

▯ संपर्क पत्ता ▯
संपादक, 'छात्र प्रबोधन',
ज्ञान प्रबोधिनी,
५१० सदाशिव पेठ,
पुणे 411 030.
कार्यालयाची वेळ : स. १० ते १२,
संध्या. ५ ते ७.
वार्षिक वर्गणी : रुपये ४०/– फक्त.